# "लातूर येथील कृषी महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांच्या वाचन अभिरूचीचा अभ्यास"

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रमाच्या पदव्यूत्तर अभ्यासक्रमाच्या पुर्ततेसाठी सादर केलेला प्रकल्प


**: संशोधक :**

*खाणापूरे प्रणिता महेशकुमार*

**-: संशोधन मार्गदर्शक :-**

***डॉ. प्रा. बी.एम. पानगे***

**ग्रंथपाल, जयकर ग्रंथालय, पूणे**


**एम.फिल.**

**ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग,**
**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी,**
**पुणे - 31**

**2014 -15**

# :: मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र ::

प्रमाणित करण्यात येते की, ***प्रणिता महेशकुमार खाणापूरे*** यांचे कायम नोंदणी क्र. १०४१३०००८४६ अभ्यासकेंद्र टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांनी **"लातूर येथील कृषी महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांच्या वाचन अभिरूचीचा अभ्यास"** हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली सन २०१४-२०१५ या शैक्षणिक वर्षात पूर्ण केला.

सदर प्रकल्प हा ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणक्रम पदव्यूत्तर अभ्यासक्रमाच्या पूर्ततेसाठी आवश्यक आहे.

स्थळ :

दिनांक : / /२०१५

***संशोधक मार्गदर्शक***

***डॉ. प्रा.बी. एम. पानगे***
***ग्रंथपाल,***
***जयकर ग्रंथालय, पुणे***

# :: अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र ::

**"लातूर येथील कृषी महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांच्या वाचन अभिरूचीचा अभ्यास"** हा प्रकल्प मी प्रणिता महेशकुमार खाणापूरे, माझा कायम नोंदणी क्र. १०४१३०००८४६ अभ्यासकेंद्र टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथून २०१४-२०१५ मध्ये स्वतः तयार केला असून त्यातील सर्व संशोधन माझे स्वतःचे आहे. पूर्वी या विषयावर संशोधन झालेले नाही याची मी खात्री करुन घेतली आहे.

स्थळ : लातूर

दिनांक : / /२०१५

***अभ्यासक***

***खाणापूरे प्रणिता महेशकुमार***

**मनोगत...**

**"लातूर येथील कृषी महाविद्यालय विद्यार्थी व प्राध्यापकांच्या वाचन अभिरूचीचा अभ्यास"** या संशोधन प्रकल्पाची निवड केल्यास खूप समाधान वाटले. महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांच्या वाचन सवयींच्या अभ्यासाविषयी माहिती करुन घेणे ग्रंथपालास आवश्यक आहे. ग्रंथपालन व्यवसायाच्या दृष्टीने निश्चितच त्याचा फायदा अनेक महाविद्यालयास होईल. या कल्पनेतून हा संशोधन प्रकल्पाचा विषय सूचला.

माझ्या संशोधन प्रकल्पाचे मार्गदर्शक म्हणून प्रा. पानगे बी.एम. सरांची निवड झाली त्यांच्याकडून वेळोवळी प्रकल्पाबद्दल मला माहिती संकलित करताना झाली. त्याचप्रमाणे हा संशोधन प्रकल्प पूर्ण करताना मला अनेक अनुभव आले, त्या अनुभवात काही चांगले तर काही वाईटपण अनुभव आले.

संशोधन कार्य करीत असताना मार्गदर्शक, प्राध्यापक व ग्रंथपाल यांच्यासोबत या प्रकल्पासंबंधी अनेक वेळा चर्चा केली. नवनवीन माहिती या प्रकल्पाच्या माध्यमातून मिळाली. त्यामुळे माझ्या वैयक्तिक ज्ञानात मोठी भर पडली असून माझ्या भावी आयुष्यात या संशोधन प्रकल्पाचा निश्चितच पूरेपूर फायदा होईल अशी माझी अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे व्यवसाईक दृष्टीने विचार केला असता अनेक ग्रंथपाल व ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना या संशोधन प्रकल्पाचा निश्चितच फायदा होईल. अशी मला खात्री वाटते.

त्याचप्रमाणे श्री. व्ही.व्ही. गिरी सर, श्री. घटकार डी.टी. आदी गुरुजनांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाला असल्यामुळे विषेश आनंद होत आहे.

***अभ्यासक***

***खाणापूरे प्रणिता महेशकुमार***

## *:: ऋणनिर्देश ::*

**"लातूर येथील कृषी महाविद्यालय विद्यार्थी व प्राध्यापकांच्या वाचन अभिरूचीचा अभ्यास"** हा संशोधन प्रकल्प निवडला. मार्गदर्शक प्राध्यापक म्हणून प्रा. पानगे बी.एम. यांची जयकर ग्रंथालय, पुणे यांची निवड करण्यात आली. त्यांनी मला वेळोवेळी योग्य ते मार्गदर्शन केले, त्यामुळे मी त्यांची मनःपूर्वक आभार मानते.

तसेच श्री. व्ही.व्ही गिरी सर, श्री. डी. टी. घटकार सर यांनी वेळोवेळी केलेल्या सूचना व मार्गदर्शन केले, यामुळे सदरील संशोधन प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्यास मदत झाली त्यामुळे मी त्यांची ऋणी आहे.

त्याचप्रमाणे माझी आई सौ. खाणापूरे सुमन हिची मला प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मोलाची साथ मिळाली त्यामुळे मी त्यांची पण ऋणी आहे.

या प्रकल्पाची अक्षर जुळवणी **श्री. सय्यद शफिक** यांनी कमीत-कमी वेळात उत्तम प्रकारची टंकलेखन करुन दिले त्याबद्दल संशोधक म्हणून मी त्यांची आभारी आहे.

अशाच प्रकारे ज्यांचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे सहकार्य लाभले, त्यांची मी संशोधक म्हणून ऋणी आहे.

***अभ्यासक***

***खाणापूरे प्रणिता महेशकुमार***
***टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे***

# अनुक्रमणिका


| प्रकरण | विवरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र** | II |
| | **अभ्यासकाचे प्रमाणपत्र** | III |
| | **मनोगत** | IV |
| | **ऋणनिर्देश** | V |
| | **अनुक्रमणिका** | VI |
| | **सारणींची यादी** | VII-VIII |
| | **पायचार्टची यादी** | IX-XI |
| | **आलेखांची यादी** | XII-XIV |
| पहिले | विषय प्रवेश | १-१८ |
| दुसरे | लातूरचा आराखडा | १९-३३ |
| तिसरे | वाचन | ३४-५४ |
| चौथे | माहितीचे संकलन | ५५-५९ |
| पाचवे | माहितीचे विश्लेष्ण व अर्थनिर्वचन | ६०-१०८ |
| | **ग्रंथपाल मूलाखात अनुसूची** | १०९-१११ |
| सहावे | निष्कर्ष व शिफारशी | ११२-११६ |
| | **संदर्भ सूची** | ११७-११९ |
| | **वाचक प्रश्नावली** | १२०-१३० |

## सारणींची यादी

| अ.क्र. | विवरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **विद्यार्थ्यांची प्रश्नावली** | |
| १ | आपणास वाचनाची सवय आहे का? | ६२ |
| २ | आपण ग्रंथालयास केंव्हा भेट देता? | ६३ |
| ३ | अभ्यासक्रमाव्यतिरिक्त आपण ग्रंथालयात कोणतो ग्रंथ वाचता? | ६५ |
| ४ | आपणास सर्वात जास्त वाचन करण्यास कोणत्या ठिकाणी आवडतो? | ६७ |
| ५ | तुमची वाचन सवय विकसीत करण्यासाठी कोणाचा सहभाग जास्त महत्त्वाचा वाटतो? | ६७ |
| ६ | वाचनाची सवय भागविण्यासाठी पूस्तके /इतार साहित्य कोठून घेता? | ६९ |
| ७ | आपण वर्तमानपत्र वाचता का? | ७१ |
| ८ | आपण नियतकालिके वाचता का? | ७२ |
| ९ | आपण नियमित पूस्तकांचो वाचन करता का? | ७३ |
| १० | आपण कोणत्या पूस्तकांचो वाचन जास्त करता? | ७४ |
| ११ | आपण ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथाचा कितपत उपयोग होतो? | ७६ |
| १२ | वाचनाची सवय होण्यासाठी ग्रंथालयाकडून आपल्या काय अपेक्षा आहेत? | ७८ |
| १३ | तूमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयात कोणतो पूस्तके असावीत असे आपणास वाटतो? | ७८ |
| १४ | तूमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयात कोणतो पूस्तके असावीत व कोणत्या भाषेत? | ८० |

# प्राध्यापकांची प्रश्नावली


| | | |
|---|---|---|
| १५ | आपल्या घरी पूस्तकांचा संग्रह आहे का? | ८२ |
| १६ | आपणास वाचनाची सवय आहे का? | ८३ |
| १७ | आपण ग्रंथालयात केंव्हा भेट देता? | ८४ |
| १८ | ग्रंथालयामध्ये वाचनासाठी आपण किती वेळ घालवता? | ८६ |
| १९ | आपण ग्रंथालयात कोणत्या उद्दीष्टाने जाता? | ८८ |
| २० | आपल्या मते ग्रंथालयाच्या वेळा सोयीच्या आहेत का? | ९० |
| २१ | आपण रिकाम्या वेळेचा उपयोग कसे करतात? | ९१ |
| २२ | आपण कोणते वाचन साहित्य जास्त वाचता? | ९३ |
| २३ | आपण सर्वात जास्त वाचन कोठे करता? | ९५ |
| २४ | वाचन सवय विकसीत करण्यासाठी आपल्याला कोणाचा सहभाग महत्त्वाचा वाटतो? | ९७ |
| २५ | वाचनाची सवय भागविण्यासाठी पूस्तके /नियतकालिके / संदर्भ ग्रंथ कोठून उपलब्ध करता? | ९९ |
| २६ | आपण नियमित कोणकोणते वर्तमानपत्र वाचता त्यांची नावे द्या? | १०१ |
| २७ | वर्तमानपत्रातील कुठल्या माहितीचे सदर आपणास आवडते? | १०१ |
| २८ | आपण नियतकालिके वाचता का? | १०२ |
| २९ | आपण नियमीत अभ्यासक्रमाव्यतिरिक्त कोणत्या पूस्तकांचे वाचन करता? | १०३ |
| ३० | आपण पूस्तकांचा शोध ग्रंथालयात कशाप्रकारे घेता? | १०५ |
| ३१ | आपण एखाद्या विषयावर संशोधन केले आहे का? | १०७ |
| ३२ | संशोधन केले असल्यास खालील माहिती द्या? | १०८ |

## आलेखाची यादी


| अ.क्र. | आलेख क्रं. | विवरण | पेज नं |
|---|---|---|---|
| | | **विद्यार्थ्याची प्रश्नावली** | |
| १ | ५.१ | ग्रंथालयास भेट दर्शविणारा आलेख | ६४ |
| २ | ५.२ | अभ्यासक्रमाव्यतिरिक्त ग्रंथालयात ग्रंथ वाचन दर्शविणारा आलेख | ६६ |
| ३ | ५.३ | वाचन सवय विकसीत करण्यासाठी सहभाग दर्शविणारा आलेख | ६८ |
| ४ | ५.४ | वाचनासाठी आवश्यक असणारी पुस्तके/ इतर साहित्य दर्शविणारा आलेख | ७० |
| ५ | ५.५ | पुस्तकांचे वाचन दर्शविणारा आलेख | ७५ |
| ६ | ५.६ | ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथाचा उपयोग/वापर दर्शविणारा आलेख | ७७ |
| ७ | ५.७ | महाविद्यालयाच्या ग्रंथालयात पुस्तकांची अपेक्षा दर्शविणारा आलेख | ७९ |
| ८ | ५.८ | महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील पुस्तकाच्या भाषेची आपेक्षा दर्शविणारा आलेख | ८१ |

| अ.क्र. | आलेख क्रं. | विवरण | पेज नं |
|---|---|---|---|
| | | **प्राध्यापकाची प्रश्नावली** | |
| ९ | ५.९ | ग्रंथालयास भेट  दर्शविणारा आलेख | ८५ |
| १० | ५.१० | ग्रंथालयामध्ये वाचनासाठी वेळ दर्शविणारा आलेख | ५७ |
| ११ | ५.११ | ग्रंथालायात जाण्याची उद्दिष्टे दर्शविणारा आलेख | ५९ |
| १२ | ५.१२ | रिकाम्या वेळेचा उपयोग दर्शविणारा आलेख | ९२ |
| १३ | ५.१३ | वाचन साहित्य दर्शविणारा आलेख | ९४ |
| १४ | ५.१४ | योग्य वाचन ठिकाण दर्शविणारा आलेख | ९६ |
| १५ | ५.१५ | वाचन सवयी विकसीत करण्यासाठी सहभाग दर्शविणारा आलेख | ९८ |
| १६ | ५.१६ | वाचनाची सवय भागवण्यासाठी उपलब्धता दर्शविणारा आलेख | १०० |
| १७ | ५.१७ | अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर पुस्तकाचे वाचन दर्शविणारा आलेख | १०४ |
| १८ | ५.१८ | ग्रंथालयात पुस्तकाच्या शोधाची पध्दत दर्शविणारा आलेख | १०६ |

## पायचार्टची यादी


| अ.क्र. | आलेख क्रं. | विवरण | पेज नं |
|---|---|---|---|
| | | **विद्यार्थ्यांची प्रश्नावली** | |
| १ | ५.१ | वाचनाची सवय दर्शविणारा पायचार्ट | ६२ |
| २ | ५.२ | ग्रंथालयास भेट दर्शविणारा पायचार्ट | ६४ |
| ३ | ५.३ | अभ्यासक्रमाव्यतिरिक्त ग्रंथालयात ग्रंथ वाचन दर्शविणारा पायचार्ट | ६६ |
| ४ | ५.४ | वाचन सवय विकसीत करण्यासाठी सहभाग दर्शविणारा पायचार्ट | ६८ |
| ५ | ५.५ | वाचनासाठी आवश्यक असणारी पुस्तके/ इतर साहित्य दर्शविणारा पायचार्ट | ७० |
| ६ | ५.६ | वर्तमानपत्र वाचन दर्शविणारा पायचार्ट | ७१ |
| ७ | ५.७ | नियतकालिके वाचन दर्शविणारा पायचार्ट | ४२ |
| ८ | ५.८ | नियमित पुस्तकांचे वाचन दर्शविणारा पायचार्ट | ७३ |
| ९ | ५.९ | पुस्तकाचे वाचन दर्शविणारा पायचार्ट | ७५ |
| १० | ५.१० | ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथाचा उपयोग/वापर दर्शविणारा पायचार्ट | ७७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | ५.११ | महाविद्यालयाच्या ग्रंथालयात पुस्तकांची अपेक्षा दर्शविणारा पायचार्ट | ७९ |
| १२ | ५.१२ | महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील पुस्तकाच्या भाषेची आपेक्षा दर्शविणारा पायचार्ट | ८१ |

| अ.क्र. | आलेख क्रं. | विवरण | पेज नं |
|---|---|---|---|
| | | **प्राध्यापकाची प्रश्नावली** | |
| १३ | ५.१३ | घरातील पुस्तकाचा संग्रह दर्शविणारा पायचार्ट | ८२ |
| १४ | ५.१४ | वाचनाची सवय दर्शविणारा पायचार्ट | ८३ |
| १५ | ५.१५ | ग्रंथालयास भेट  दर्शविणारा पायचार्ट | ८५ |
| १६ | ५.१६ | ग्रंथालयामध्ये वाचनासाठी वेळ दर्शविणारा पायचार्ट | ८७ |
| १७ | ५.१७ | ग्रंथालायात जाण्याची उद्दिष्टे दर्शविणारा पायचार्ट | ८९ |
| १८ | ५.१८ | ग्रंथालयाच्या वेळा योग्य की अयोग्य दर्शविणारा पायचार्ट | ९० |
| १९ | ५.१९ | रिकाम्या वेळेचा उपयोग दर्शविणारा पायचार्ट | ९२ |
| २० | ५.२० | वाचन साहित्य दर्शविणारा पायचार्ट | ९४ |
| २१ | ५.२१ | योग्य वाचन ठिकाण दर्शविणारा पायचार्ट | ९६ |
| २२ | ५.२२ | वाचन सवयी विकसीत करण्यासाठी सहभाग दर्शविणारा पायचार्ट | ९८ |
| २३ | ५.२३ | वाचनाची सवय भागवण्यासाठी उपलब्धता दर्शविणारा पायचार्ट | १०० |
| २४ | ५.२४ | नियतकालिके वाचन दर्शविणारा पायचार्ट | १०२ |
| २५ | ५.२५ | अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर पुस्तकाचे वाचन दर्शविणारा पायचार्ट | १०४ |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | ५.२६ | ग्रंथालयात पुस्तकाच्या शोधाची पध्दत दर्शविणारा पायचार्ट | १०६ |
| २७ | ५.२७ | विषयातील संशोधन दर्शविणारा पायचार्ट | १०७ |

## प्रकरण पहिले

# विषय प्रवेश

१.१ प्रस्तावना

१.२ विषय निवडी मागची भूमिका

१.३ संशोधनाची उद्दिष्ट्ये

१.४ व्याप्ती

१.५ विषयाची अभ्यासाच्या दृष्टीने आवश्यकता / गरज

१.६ गृहितके

१.७ संशोधन पध्दती

१.८ पूर्व साहित्याचा अभ्यास

## १.१ प्रस्तावना :

वाचनामुळे ज्ञानात भर पडते, पूस्तके, ग्रंथ यांच्या वाचनाने प्रत्यक्ष गुरू माध्यमातून ज्ञानाची प्राप्ती होते. ज्याप्रमाणे एकलव्य यांनी गुरू द्रोणाचार्य हे त्यांच्या शिष्यांना कशाप्रकारे शिक्षण देतात हे दूरून पाहिले त्यांचे चिंतन करून प्रत्यक्ष गुरूंनी त्यांना ज्ञान दिले नाही तरी त्यांनी मिळविलेल्या अप्रत्यक्ष माहितीतून जे धनुर्विद्या वाकबगार म्हणून गणले गेले. तसेच ग्रंथाचे लेखक अथवा पूस्तकांचे लेखक हे प्रत्यक्षपणे वाचकांना भेटू शकले नसले तरी त्यांना पुस्तकांत मांडलेले विचार वाचून वाचकांच्या ज्ञानात भर पडते आणि ज्ञानाची उंची उंचावते. 'मेंडल' (Mendel) या ख्यातनाम कृषि शास्त्रज्ञाने विविध नियतकालिकांतून प्रसिध्द केलेल्या शोध निबंधाचे त्यांच्या नंतरच्या शास्त्रज्ञांनी वाचन करून त्यापुढे अनेक नामांकित शोध मानवाच्या शास्त्रज्ञांनी वाचन करुन त्यापुढे अनेक नामांकित शोध मानवाच्या हिताच्या दृष्टीने लावले. तात्पर्य वाचनाने पुढील नवीन संशोधनाचे टप्पे गाठता येतात.

विद्यार्थ्यांच्या वाचनाच्या दृष्टीने ग्रंथ, पुस्तके, नियतकालिके, वृत्तपत्रे, बुलेटिन (माहिती पत्रके) याद्वारे प्रामुख्याने आजपर्यंत विद्यार्थ्यांना वाचनाच्या दृष्टीने ज्ञानाची द्वारे खूली होती. परंतू संगणकाच्या आगमनानंतर इंटरनेटद्वारे क्षणार्धात राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय बाबी वाचनासाठी त्वरित उपलब्ध झाल्या आहेत. खऱ्या अर्थाने तरूण विद्यार्थी वाचकांना वाचनाचे महाद्वार खुले झाल्याने भविष्यकाळात मानवाच्या हिताच्या दृष्टीने आणखी प्रचंड शोध लागून मानवी जीवन सुखी होण्याच्या दृष्टीने त्यांचा लाभ होणार आहे.

वाचन हे व्यक्तीच्या व्यक्तीगत ज्ञानात आणि त्या वाचकांच्या ज्ञानात भर पडते. असंख्य साहित्यिक ग्रंथ निर्माण करीत आहेत. त्यात कृषी साहित्य हा वेगळा विषय आहे. ग्रामीण जीवनाशी निगडीत साहित्य, ग्रामीण जीवनाशी निगडीत कविता या बाबतीत पिंपळखेडचे कवि 'नारायण सुर्वे' यांनी कृषि विषयावर केलेल्या कविता पाहता आणि त्यांना मिळालेले मान सन्मान पाहता या साहित्यातून ग्रामीण जीवनाचे अंग लक्षात येते. तर संत बहिणाबाई चौधरी यांच्या साहित्यातून ग्रामीण मानवी जीवनाची आणि नैसर्गिक जीवनाची सांगड उकलते. तात्पर्य

साहित्य वाचनाने मानवी जीवन वृध्दींगत होते.

अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन जसे सुप्रसिध्द राष्ट्राध्यक्ष म्हणून ओळखले जात, तसेच ते पूस्तकांचे गाढे अभ्यासक म्हणून ओळखले जाते. अब्राहम लिंकन म्हणतात. 'जो कोणी मला न वाचलेले पूस्तक देईल तो माझा उत्तम मित्र मला वाटतो'. माणूस हा शिकणारा प्राणी आहे. दृष्टीने पाहून, कानाने ऐकूण आणि डोळ्याने वाचन करून शिक्षणाचे अभ्यासक्रम प्रामुख्याने पूर्ण केले जातात. या प्रमूख तीन भागापैकी वाचन या भागसाठी साक्षरतेची आवश्यकता असते. साक्षरता ज्ञान मिळविण्याचा तिसरा डोळा समजला जातो. त्यामुळेच माणसाच्या विकासाला वाचनाद्वारे गती मिळते.

ऐतिहासिक, भौगोलिक, वाङ्मयीन, वाणिज्य आणि शास्त्रीय असे वाचनाचे साहित्य भांडार ग्रंथालयाच्या रूपाने उपलब्ध झाले आहे. केवळ हे वाचकांवर त्यास निर्माण होणाऱ्या गोडीवर आणि त्यांच्या आवडीनिवडीवर वाचनाचा छंद वाढतो. मनुष्य साक्षर असेल तरच ही दिव्यदृष्टी प्राप्त होते. अन्यथा या सर्व ज्ञानापासून त्याला वंचित रहावे लागते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये, ज्ञानाच्या कक्षेमध्ये दिवसेंदिवस भर पडतच आहे. अशा अवस्थेत मानव जीवन हे घड्याळाच्या काट्यावरच आधारलेले आहे. वाचनापेक्षा इतर मार्गाने ज्ञान मिळविण्याकडे लोकांचा कल वाढतच चालला आहे. त्याचा चांगला वाईट परिणाम वाचकांच्या वाचनावर झालेला दिसून येतो.

मानवाचा सर्वांगीण विकास साधला जावा, त्याला सत्याचा शोध घेता यावा, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण योग्य प्रकार व्हावी, एक आदर्श चारित्र्य संपन्न, सुसंस्कारक्षम नागरिक निर्माण व्हावा याकरिता विद्यार्थ्याला आपल्या जीवनातील बालपणापासून काही काळ प्रत्यक्ष विद्यार्थीदशेत घालवावा लागतो. या काळात तो त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेली विद्या प्राप्त कोणी अधिक विद्या प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो. आपल्या क्षमतेप्रमाणे कोणी अधिक विद्या प्राप्त करील, कोणी कमी करेल ही क्षमता त्यांच्या वाचन सवयीवर अवलंबून असते.

औपचारिक तसेच अनौपचारिक पध्दतीने तो शिक्षण प्राप्त करीत असतो. ज्या शिक्षणातून विद्यार्थी जीवन जगण्यास समर्थ बनावा अशा शिक्षणाचा व विद्यार्थ्यांचा घनिष्ट संबंध जोडला गेला आहे. शिक्षण त्यांच्या जीवनाला आकार देणारे असते. त्याच्या कोऱ्या पाटीसारख्या मनावर असंख्य शैक्षणिक अनुभव आणि जीवनोपयोगी संस्कार कोरले जात असतात. म्हणून विद्यार्थ्यांच्या जीवनात वाचन सवयीस अनन्यसाधारण महत्त्व आहे.

## १.२ विषय निवडीचा हेतू (विषय निवडी मागची भूमिका) :

कृषी महाविद्यालय, लातूर येथील विद्यार्थी व प्राध्यापकांच्या वाचनाच्या सवयी हा विषय निवडताना वरील मूलभूत तत्त्वांचा विचार करूनच ठरविण्यात आला. कृषी महाविद्यालय, लातूर येथील असणारे सर्वच वाचक हे भारतातील विविध प्रांतातून जसे आलेले आहेत तसेच महाराष्ट्रातील शहरी आणि विविध ग्रामीण भागातून आलेले आहेत. प्रत्यकांचे प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षण हे शहरात अथवा खेड्यात झालेले आहे. यातील बरेच वाचक हे ग्रामीण भागातून आलेले असल्याने. लातूरच्या महाविद्यालयातील जेवढे प्रशस्त ग्रंथालय आहे तेवढे त्यांना पाहायला मिळाले नसेल. लातूर येथील कृषी महाविद्यालय ग्रंथालयात कृषी उद्यान, पशुवैद्यकीय, हवामान या व्यतिरिक्त कृषीशी संबंधीत असणारे विविध शाखांची पूस्तके उपलब्ध आहेत. त्याचबरोबर मराठीतील विविध ग्रंथ उपलब्ध आहेत. तसेच भारतातून व महाराष्ट्रातून येणारी नियतकालिकेदेखील उपलब्ध आहेत. त्याकडे फूलपाखराप्रमाणे आकर्षिली जाणारी वाचके त्यांच्या वाचनाबाबतच्या सवयीचा विषय निवडावा हेच सदैव जाणवल्याने त्याविषयाची निवड या अभ्यासासाठी केला.

प्रत्येक ग्रंथालयाचा प्रमुख उद्देश हा वाचकांच्या गरजा भागविणे हा असतो. त्यामुळेच सर्व शैक्षणिक ग्रंथालयाचा उपयोग अध्ययन व अध्यापनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी वाचकांना उपयुक्त असे वाचन साहित्य संग्रहित करणे, ते विकसित करून जतन करणे आणि विविध प्रकारच्या ग्रंथालय सेवा व सुविधा पूरविणे यामुळे वाचकांच्या वाचन सवयीमध्ये वाढ करणे,

वाचकांनी ग्रंथालयाकडे झेप घ्यावी टिपणे काढावी असे वातावरण निर्माण करणे, डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या पंचसुत्रानुसार प्रत्येक ग्रंथ उपयोगासाठी आहेत. परंतू प्रत्येक ग्रंथाचा उपयोग होतो असा नाही. त्यामुळे संदर्भीय वाचन हा त्याचाच एक भाग बनू पाहत आहे. या सर्व बाबींचा सखोल विचार करता ग्रंथालय हा शिक्षणव्यवस्थेचा मूलभूत पाया आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. अभ्यास करण्यासाठी वाचक ग्रंथालयाचा वापर किती प्रमाणात करतात. कृषी (शेतकी) महाविद्यालयातील वाचकांच्या वाचनसवयी विविध प्रकारच्या दिसून येतात.

वाचकांच्या वाचन सवयींचा अभ्यास करताना, त्यामुळेच या वर्गाच्या संदर्भाने विचार करणारे क्रमप्राप्त ठरते. काही वाचक हे नैसर्गिकरीत्या त्याच्या सवयींप्रमाणे वृत्तपत्र वाचन व त्यानंतर अभ्यासाची पूस्तके, वाचनाकडे झूकताना दिसतो. तर काही वाचक हे नियतकालिके चाळताना दिसतात. या अशा प्रकारे वाचकांच्या वाचन सवयी का असाव्यात याबाबत मनामध्ये प्रश्न निर्माण होतात.

माहिती तंत्रज्ञानामुळे झालेल्या बदलांचा वाचकांच्या वाचन सवयींवर निश्चित परिणाम होताना दिसतो. उदाहरणच द्यायचे झाल्यास दूरदर्शनवरती ऐकलेल्या बातम्यां आणि त्यानंतर वर्तमानपत्रातील सविस्तर बातम्यांकडे वाचक वर्ग वळलेले पाहताना एखाद्या विषयाची थोडीही माहिती उपलब्ध होताच त्याविषयीचे सखोल वाचन वृत्तपत्रामधून करणे हे त्यांना जरुरीचे वाटते. यामध्ये प्रामुख्याने चालू घडामोडी यावर वाचकांचा भर दिसतो, तर नवीन उपग्रह अथवा क्षेपणास्त्र अथवा कृषीमधील नवनवीन तंत्रज्ञान आणि शोध ाबाबत माहितीचा मागोवा घेणारा वाचकवर्ग पाहताना या व्यक्तीवर माहिती व तंत्रज्ञानाचा परिणाम होतो की काय? याचा अंदाज घेणे जरुरीचे वाटते.

कृषी महाविद्यालयातील ग्रंथालयामधील वाचन साहित्य संग्रह, वाचकांना दिल्या जाणाऱ्या सर्व सुखसोई या सर्वांचा विद्यार्थी व प्राध्यापक कितपत ग्रंथालयातील सर्वांचे वाचन म्हणून वापर करतात का हे जाणून घेण्याची जिज्ञासा मनामध्ये निर्माण झाली. तसेच विविध शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रंथालयाचे वेगवेगळे विषय घेऊन संशोधन हे झालेले आहे, पण कृषी

महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांच्या वाचन सवयींविषयी दुर्लक्ष झालेले दिसून आले. त्यासाठी लातूर येथील कृषी महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांच्या वाचन सवयींचा अभ्यास या विषयाची संशोधनासाठी निवड करण्यात आलेली आहे.

**१.३ संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१. कृषी महाविद्यालय, लातूर येथील विद्यार्थी व प्राध्यापकांच्या वाचन सवयींचा अभ्यास करणे.

२. कृषी महाविद्यालय, लातूर मधील ग्रंथालयातील उपभोक्त्यांच्या वाचन सवयींचा शोध घेणे.

३. उपभोक्त्यांच्या वाचनांविषयी भविष्यकालीन वाचन - सवयींचा परामर्ष घेणे.

४. उपभोक्त्यांच्या वाचन - सवयीला अनुसरुन असणाऱ्या समस्या शोधून त्या दूर करण्यासाठी उपाय सूचवणे.

**१.४ व्याप्ती :**

सादर करण्यात येणाऱ्या संशोधनासाठी केवळ वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांच्या अंतर्गत चालणाऱ्या कृषी महाविद्यालय, लातूर या महाविद्यालयापूरती मर्यादित आहे. सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षातील वाचकांच्या वाचन - सवयींचा शोध घेतला जाणार आहे. जरी ही कृषी महाविद्यालयापूरती मर्यादित असली तरी ही या अभ्यासाची व्याप्ती कृषी क्षेत्रांतर्गत सर्वच वाचकांसाठी निश्चित उपयूक्त होईल.

**१.५ विषयाची अभ्यासाच्या दृष्टीने आवश्यकता / गरज :**

कृषी महाविद्यालयाचे ग्रंथालय आणि त्यांचा ग्रंथसंग्रह वाचकांच्या गरजेनुसार अनुरूप राहण्यासाठी वाचक (उपभोक्ते) कोणत्या प्रकारचे वाचन साहित्य वापरतात व वाचतात याची

माहिती घेणे व तसेच त्यांचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. त्यादृष्टीने ही बाब अतिशय आवश्यक असून ती ग्रंथालयाच्या विकास व ग्रंथालयाचे यश तसेच वाचकांना पूरविल्या जाणाऱ्या सेवा व सुविधा यावर प्रामुख्याने अवलंबून असते, म्हणून वाचकांच्या (उपभोक्त्यांच्या) गरजा आवडीनिवडी याची माहिती ग्रंथपालांना असणे आवश्यक असते. त्यासाठी सदरचे संशोधन हाती घेणे आवश्यक आहे. या संशोधनातून या अभ्यासाची आवश्यकता आणि गरज स्पष्ट होईल, असे दिसून येते. गरजेनुसार साहित्य उपलब्धता ही बाब का कोणत्याही यशामागचे सुत्र ठरू शकते, हे ध्यानात घेणे गरजेचे असून गरज ही यशाची जननी आहे आणि त्या दृष्टीने प्रयत्न ही त्याची पूर्तता आहे.

अभ्यास हा सखोल होणे ही बाब सखोल ज्ञानार्जनाच्य दृष्टीने निश्चितच गरजेची असून सर्वांगीण ज्ञानाच्या दृष्टीने विषयांची सांगोपांग मांडणी आणि त्याचा क्रम यामुळे समजेल, अशा दृष्टीने त्या विषयाचे ज्ञान प्राप्त होण्यास मदत होते, कोणताही विषय हा कितीही माहितीद्वारे स्पष्ट केला तरी त्या विषयात दररोज नवनवीन भर पडत असते. त्यामुळे त्या विषयाचे ज्ञान अद्यावत करणे हे वाचकांचे उद्दिष्ट असल्याशिवाय त्याची पूर्तता होत नाही. प्रत्येक विषयाच्या अनुषंगाने वेगवेगळी संदर्भ पूस्तके उपलब्ध असतात. त्या संदर्भीय पूस्तकात त्या-त्या लेखकाने आपल्या भाषेत त्या विषयाच्या ज्ञानाची मांडणी केलेली असते. एखादा विषय एखाद्या पुस्तकात वाचल्यास तो समजतो आणि सोपा वाढतो. अभ्यासाच्या दृष्टीने अशा प्रकारच्या पुस्तकाची आवश्यकता असते. वाचक जे पूस्तक पुन्हापुन्हा घेतात आणि वाचतात अशा एखाद्या पूस्तकाचे वाचक भरपूर असू शकतात तर काही पुस्तकांच्या क्लिष्ट भाषांमुळे त्या पूस्तकाचे वाचक कमी दिसतात. अशा प्रकारे कोणत्याही प्रकारच्या विषयाच्या अभ्यासाच्या दृष्टीने उपयूक्त आणि सोप्या भाषेतील पूस्तकांची वाचकांना गरज असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांचे संशोधन होणे गरजेचे असते.

**१.६ . गृहितके :**

१. कृषी महाविद्यालय लातूर येथील विद्यार्थी व प्राध्यापकांच्या वाचन सवयीचा अभ्यास करता येतो.

२. कृषी महाविद्यालय लातूर येथील ग्रंथालयातील उपभोक्त्याच्या वाचन सवयीचा शोध घेता येतो.

३. उपभोक्त्याच्या वाचनाविषयी भविष्यकालिन वाचन सवयीचा परामर्श घेता येतो.

४. उपभोक्त्याच्या वाचन सवयीला अनूसरून असाणाऱ्या समस्या शोधून, त्या दूर करून उपाय सुचवणे शक्य आहे.

**१.७ संशोधन पध्दती :**

**संशोधन : अर्थ, व्याख्या :**

संशोधन या शब्दाला इंग्रजीत 'रीसर्च' (Research), असे म्हणतात. 'रिसर्च' हा शब्द फ्रेंच 'सर्चिर' या शब्दापासून आलेला आहे. याचा अर्थ 'पून:पून्हा शोध घेणे' असा आहे.

'एकदा घेतलेल्या शोधातून नवीन तथ्ये किंवा तत्त्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा परिक्षण म्हणजे संशोधन होय'.

**साधू आणि सिंग :**

संशोधनामागे सत्यासत्याला पडताळून पाहण्यासाठी सतत व पध्दतशीर अभ्यास पुनः पुनः केले जाऊन निष्कर्ष काढले जातात. "(Re-examin and to reunderstanding things may rightly be called research")

**सी.ए. मोझर :**

'संशोधन म्हणजे सामाजिक घटना आणि समस्याबाबत नवीन ज्ञानप्राप्तीकरिता करण्यात

आलेला व्यवस्थित संशोधनाला सामाजिक प्रबोधन असे म्हणतात.' (Systematic investigation to gain new knowledge about social phenomena and problems cell social research)

**बुशा आणि हार्टर :**

"A more efficient and effective approach to expand knowledge, however, is the conduct of special, planned, and structured investigation a process known as research."

**जे. डब्ल्यू बेस्ट :**

"कोणत्याही गोष्टीचा शोध घेण्यासाठी, संघटित ज्ञानाचा विकास घडवून आणण्यासाठी संशोधन हे क्रमबध्द म्हणजे व्यवस्थित आणि अत्यंत पध्दतशीर असावे लागते."

**दु.का.संत :**

"शोध पध्दतीशास्त्र (Research Methodology) ही शोध प्रक्रियेत अत्यावश्यक असले तरी ते उपांग आहे, म्हणजे शिक्षणाची विशिष्ट पात्रता मिळविल्यानंतर साह्य आणि साधन यांची संगत झालेला आहे. म्हणून संशोधनात शोधप्रक्रिया ही अत्यंत महत्त्वाची ठरते."

Research या इंग्रजी शब्दाला संशोधन हा प्रतिशब्द वापरला जातो. वेबस्टरच्या शब्दकोशात (Webster's New World Dictionary) Research (संशोधन या शब्दाचा अर्थ पुढील प्रमाणे दिलेला आहे.)

"संशोधन म्हणजे ज्ञानाच्या एखाद्या शाखेत नवीन तथ्ये किंवा तत्त्वे शोधण्यासाठी किंवा जुनी तथ्ये किंवा तत्त्वे तपासण्यासाठी काळजीपूर्वक पध्दतशीर व नेटाने केलेला अभ्यास होय." कोणतेही संशोधन हाती घेऊन पूर्ण करण्यासाठी एखाद्या विशिष्ठ संशोधन पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. कोणत्याही विषयाचा विकास त्या विषयातील संशोधनावर अवलंबून असतो.

संशोधन म्हणजे अत्यंत पध्दतशीर घेतलेला सत्याचा शोध, ज्ञानाचे क्षेत्र व्यापक

करण्याकरिता समस्याचे आकलन व निराकरण करण्याकरिता आणि एकंदर मानवी जीवन प्रगतीशील व समृध्द करण्याकरिता संशोधन हे महत्त्वाचे साधन आहे. ज्ञान मिळविण्यासाठी वैज्ञानिक पध्दतीचा उपयोग करण्याच्या प्रक्रियेला संशोधन म्हणतात येईल. 'संशोधनाची प्रक्रिया वस्तूनिष्ठ असावी लागते. तरच संशोधक स्थायी अशा निष्कर्षाप्रती येतो. संशोधन पध्दतीला संशोधनाच्या प्रक्रियेत असाधारण महत्त्व आहे.

संशोधन ही समस्या निराकरणाची सुव्यवस्थित प्रक्रिया आहे. मानवी मनाला अस्वस्थ करणाऱ्या बहुविद्य समस्यांचा सप्रमाण व विश्वसनीय साधनासाठी आवश्यक असलेल्या तथ्यांचे संकलन व विश्लेषण करुन त्यांचा अन्वयार्थ लावण्याची व्यवस्थाबध्द प्रक्रिया म्हणजे संशोधन होय.

संशोधनामुळे सामान्यीकृत निष्कर्षाची सिध्दांताची व तत्त्वांची निर्मिती होते व यातूनच नवीन ज्ञान निष्पन्न होते. "शैक्षणिक संशोधन विविध पध्दतीने केले जाते. १.भूतकाळाशी संबंधीत असणाऱ्या समस्यांचे संशोधन. २. वर्तमानकाळाशी संबंधीत असणाऱ्या समस्यांचे संशोधन. ३.भविष्यकाळाशी संबंधीत असणाऱ्या समस्याचे संशोधन." लातूर येथील कृषी महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांच्या वाचन सवयींचा अभ्यास करावयाचा असल्याने सदर संशोधन हे सामाजिक संशोधन आहे.

सामाजिक संशोधनाबद्दल श्रीमती पॉलीन व्ही. यंग म्हणतात, "सामाजिक संशोधन एक शास्त्रीय योजना असून जिचा उद्देश तार्किक आणि कृमबध्द पध्दती द्वारा नवीन तथ्यांचा शोध घेणे किंवा जुन्या तथ्यांचे पूर्वपरीक्षण आणि त्यांच्यात आढळून येणारे अनुक्रम अत:संबंधी कार्यकारण भाव आणि त्यांनी संचलित करणाऱ्या नैसर्गिक नियमाचे विश्लेषण करणे होय."

सर्व प्रकारचे शैक्षणिक संशोधन वैज्ञानिक किंवा शास्त्रीय पध्दतीनेच करण्यात येते, तथापि संशोधन विषयाची माहिती गोळा करण्याच्या व संशोधन विषयांच्या अस्तित्वानुसार सामाजिक संशोधनाचे तीन प्रमुख प्रकार आहेत.

१) ऐतिहासिक संशोधन पध्दती (Historical Methods)

२) वर्णनात्मक संशोधन पध्दती (Descriptive Methods)

३) प्रायोगिक संशोधन पध्दती (Experimental Methods)

प्रस्तूत संशोधनाचा विषय हा वर्तमानाशी संबंधित असल्याने संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केलेला आहे व सर्वेक्षण हे तंत्र वापरलेले आहे. कारण वाचकांच्या वाचन सवयी या प्रश्नावलीच्या आधाराने शोधून त्याचे वर्णन करण्यात येणार आहे. वेगवेगळ्या वाचन सवयीवर वेगवेगळ्या अंगाने सविस्तर विवेचन करण्यात येणार आहे. म्हणून यासाठी वर्णनात्मक पध्दत वापरली आहे.

### १.७.१ वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा संशोधनास उपयोग :

प्रस्तूत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. कारण वर्णनात्मक पध्दतीमध्ये संशोधकाने निवडलेल्या कोणत्याही विषयांचा किंवा समस्यांचा सर्वकष अभ्यास करण्यात येतो. आणि यथार्थ व संपूर्ण माहिती गोळा करण्यात येते. संबंधीत गोळा केलेली माहिती नंतर योग्य अशा वैज्ञानिक पध्दतीद्वारे एकत्रित करण्यात येते. आणि त्या माहितीचे तंत्रशूध्द विश्लेषण करून चिकित्सा किंवा स्पष्टीकरण देता येते. म्हणजे विश्लेषणानंतर तत्वचिंतनाने निघालेल्या निष्कर्षावरुन संशोधकाला परिस्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी योग्य त्या मार्गदर्शक सूचना करता येतात.

थोडक्यात वर्णनात्मक संशोधनात खालील गुणाचे अस्तित्त्व जाणवते -

१. प्रश्नावलीद्वारे वस्तूनिष्ठपणे गोळा केलेली माहिती.

२. गोळा केलेल्या माहितीचे तंत्रशूध्द विश्लेषण.

३. चिकित्सा.

४. चिकित्सेला लाभलेली चिंतनाची पार्श्वभूमी.

त्याचबरोबर संशोधनाच्या दृष्टीकोनातून उपयूक्त अशा खालील गोष्टी विचारात घेता येतात.

**१) संशोधन विषयाची विचारपूर्वक निवड :**

विचारपूर्वक व सावधगिरी बाळगून ज्या विषयाच्या संबंधात आवश्यक आणि योग्य अशी माहिती प्राप्त होणार आहे. असाच विषय संशोधकास निवडावा लागतो.

**२) तथ्य संकलनाचे योग्य तंत्र आणि साधनांची निवड :**

संशोधनाचे अचूक निष्कर्ष काढण्याकतिा तथ्ये वस्तूनिष्ठ असावी लागतात. म्हणून तथ्य संकलन करण्यासाठी कोणती तंत्रे योग्य आहेत, याचा विचार करूनच त्या तंत्राची निवड संशोधकाला करता येते.

**३) मितव्ययता :**

वर्णनात्मक संशोधन हे अधिक विस्तृत असते म्हणून या घटकानुसार संशोधकाला त्याचे अध्ययन मर्यादित ठेवण्यास मदत होते. संशोधनातील अनावश्यक गोष्टी टाळून विषयासंबंधी ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्याच गोष्टींचा समावेश करता येतो.

**४) संतूलित दृष्टिकोन :**

वर्णनात्मक पध्दतीच्या या घटकानुसार संशोधकाला विशिष्ट व आकर्षक तथ्यांकडे अधिक लक्ष केंद्रित न करता संतुलित दृष्टिकोन कायम ठेवून संबंधित विषयाच्या सर्वच तथ्याकडे सारखेच लक्ष देण्यास मदत होते.

**५) वस्तुनिष्ठता :**

संशोधन विषयासंबंधीची संशोधकाची दृष्टी ही वस्तूनिष्ठ असावी लागते. पूर्वगृह, गैरसमज, पक्षपात इ. गोष्टींचा परिणाम वर्णनात्मक विवेचनावर होऊ नये म्हणून संशोधकाने जागरूक राहून अशा गोष्टींपासून अलिप्त राहता येते. तसेच विश्लेषणात अतिशयोक्ती राहणार नाही याची दक्षता घेता येते.

संशोधकाने वर्णनात्मक पध्दतीची उपयूक्तता लक्षात घेऊन सदर संशोधनासाठी या पध्दतीचा अवलंब केला आहे.

### १.७.२ पाहणी तंत्र किंवा सर्वेक्षण :

वर्णनात्मक संशोधन पध्दतीने माहिती संकलित करण्यासाठी या तंत्राचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. प्रस्तूत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दती वापरलेली असल्याचे पाहणी तंत्र स्वीकारण्यात आले आहे.

पाहणी म्हणजे सर्वेक्षण होय. कोणत्याही वस्तू किंवा घटनांचे निरीक्षण आणि परीक्षण होय आणि ते सामाजिक घटकांशी संबंधित असेल तर त्याला सामाजिक सर्वेक्षण म्हटले जाते.

सामाजिक सर्वेक्षणाबद्दल ए.एच. वेल्स म्हणतात. "साधारणपणे कोणत्याही क्षेत्रात राहणाऱ्या एका मानव समूहाच्या सामाजिक संस्था व क्रियांच्या अध्ययनाच्या रूपात सामाजिक सर्वेक्षणाची व्याख्या केली जाऊ शकते."

### पाहणी तंत्राचे आदर्श गुण :

१. अध्ययन किंवा संशोधन विषयाशी प्रत्यक्ष संबंध येतो.

२. वस्तूनिष्ठ अध्ययन करता येते.

३. सामाजिक परिवर्तन व त्यांच्या परिणामांचे ज्ञान होते.

४. शास्त्रीयता प्राप्त करण्यात यश मिळते.

वरील आदर्श गुण लक्षात घेऊन पाहणी तंत्राचा माहिती संकलन करण्यासाठी वापर केलेला आहे.

### १.७.३ प्रश्नावली :

प्रश्नावली ही प्रश्नांची एक पूर्वनियोजित क्रमाने मांडण्यात आलेली यादी असते. प्रश्नावलीतील प्रश्नांची उत्तरे देणाऱ्याने कोणाचीही मदत न घेता लिखित स्वरूपात द्यावयाची असतात. सामाजिक संशोधनात प्रश्नावलीला फार महत्त्वाचे स्थान आहे.

प्रश्नावली पध्दतीत काही विशेष गुण आहेत. त्यामुळे प्रश्नावलीचे महत्त्व स्पष्ट होते.

प्रश्नावलीच्या खालील गुणांचा उपयोग संशोधकाला त्याच्या संशोधनासाठी होतो.

१. स्वतंत्र आणि प्रामाणिक माहिती मिळते.

२. कमीत कमी खर्च.

३. माहिती लवकर मिळते.

४. विस्तृत / मोठ्या क्षेत्रात अध्ययन करता येते.

५. प्रश्नांची उत्तरे उत्तरदाता स्वतः भरतो.

६. प्रश्नावलीचे उत्तर देत असताना कोणताही दबाव नसतो.

प्रश्नावली भरून घेताना कोणतीही अट न ठेवता पूर्णपणे स्वातंत्र्य देऊन विचार मांडण्यास वेळ देता आल्याने स्वतंत्र आणि प्रामाणिक माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली साधन अत्यंत उपयूक्त ठरते.

**प्रश्नावलीचे दोन प्रकार :**

१) मूक्त प्रश्नावली

२) बंदिस्त प्रश्नावली

संशोधन प्रक्रियेस व संख्याशास्त्रीय प्रक्रियाबध्द प्रश्न अधिक योग्य असतात.

प्रस्तूत संशोधनात वाचकांकडून प्रश्नावलीद्वारे माहिती गोळा केली आहे.

**१.७.४ मुलाखत :**

सामाजिक संशोधनात मुलाखत ही अतिशय महत्त्वाचे साधन मानले जाते. कारण मुलाखत पध्दतीत काही विशेष गुण आहेत. त्यांचा संशोधनाला उपयोग होतो. ते गुण पुढीलप्रमाणे

**१) माहितीची सत्यता पडताळून पाहणे :**

ग्रंथपालांनी व्यक्त केलेल्या विचारांवर प्रति प्रश्न विचारून तसेच उत्तरदात्यांनी प्रश्नावली मध्ये दिलेल्या माहितीची सत्यता ग्रंथपालांच्या मुलाखतीतून पडताळून पाहण्यास मदत होते.

**२) अदृश्य घटनांचे अध्ययन :**

निरीक्षण हे तंत्र वापरून ज्या गोष्टी दृष्टीस येत नाहीत, जसे एकूण ग्रंथसंख्या, वर्गीकरण, तालिकीकरण पध्दती, देवघेव पध्दती, ग्रंथ निवड, ग्रंथालय संघटन, आर्थिक व्यवस्थापन इ. घटनांची माहिती संकलित करणे मुलाखत साधनाने शक्य होते.

**३) सर्व प्रकारच्या माहितीचे संकलन :**

सदर संशोधनात वाचकांकडून जी माहिती मिळविणे अशक्य असते त्या सर्व माहितीचे संकलन ग्रंथपालांच्या मुलाखतीद्वारे करता येते.

**४) भूतकालीन घटनांचे अध्ययन :**

या घटकांनुसार दोन्ही ग्रंथालयांची पार्श्वभूमी किंवा घडलेल्या घटनांची अधिकाधिक विश्वसनीय व प्रामाणिक तथ्ये संकलित करण्यासाठी मदत होते.

**मुलाखतीचे दोन प्रकार :**

१) साचेबंद मुलाखत (Structured Interview)

२) मूक्त मुलाखत (Nee - Structured Interview)

मुलाखत म्हणजे संशोधनाकरिता आवश्यक असलेली आधारसामग्री मिळविण्यासाठी केलेली वैचारिक देवघेव, मुलाखतीच्या साधनाने प्रतिसादकांचे अनुभव, भावना, मते, अभिवृत्ती, समस्या इ., चा अभ्यास करण्याची संधी संशोधकास मिळत. सर्वसामान्यपणे अशा व्यक्तींचीच मुलाखत आयोजित केली जाते. संबंधित प्रश्नासंबंधी विशेष माहिती मिळविणे हे मुलाखतीचे उद्दिष्ट असते.

बोगार्डस् यांच्या मते, "अनुसूचीचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे प्रश्नांचे उत्तराच्या माध्यमातून संशोधन म्हणजे प्रश्नांचे उत्तराच्या माध्यमातून संशोधन विषयासंबधीची वस्तुनिष्ठ माहिती संकलित करणे हा होय."

(The schedule represents a formal method for seccuring facts that are in objective form and easily disernible. The sehedule is filled out by the investigator himself.)

**तात्पर्य :**

ह्या संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दती वापरली आहे. यासाठी माहितीचे संकलन करण्यासाठी प्रश्नावली साधन हे वापरले आहे. माहितीचे संकलन करण्यासाठी वाचकांना प्रश्नावली देण्यात आली व प्रश्नावली मार्फत सद्यस्थितीची अद्यावत माहिती प्राप्त केली.

**१.८ पूर्व साहित्याचा अभ्यास :**

१) श्रीमती ल.रा. तो. वाणिज्य महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील वाचकामध्ये वृत्तपत्र वाचनाची सवय. काळे, अलका कुमार, केंद्र - अकोला.

२) दूरदर्शनचा विद्यार्थ्यांच्या वाचन अभिरूचीवर झालेला परिणाम : एक अध्ययन. जैन प्रकाशचंद ताराचंद, केंद्र - अकोला.

३) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची वाचन पसंती - न्यू लॉ कॉलेज विद्यार्थी. धिरडे प्रभाकर गोविंद, केंद्र - अहमदनगर.

४) जीवन विकास विद्यालय, उमदेड, विद्यार्थ्यांची वाचन अभिरूची, हेगवू कृष्णा लिमाजी, केंद्र - नागपूर.

५) य.च.म.मु. विद्यापीठ नाशिक व नगर ग्रंथालय शास्त्र विद्यार्थ्यांच्या वाचन सवयीचा अभ्यास. कवडे सूर्यभान गंगाधर, केंद्र - नाशिक.

६) जळगाव जिल्हा वरिष्ठ महाविद्यालयीन पदव्युत्तर विद्यार्थी व शिक्षक यांच्या वाचन सवयींचा अभ्यास. निकम - लक्ष्मण आर., केंद्र - नाशिक.

७) ज्ञानोपासक महाविद्यालयातील प्राध्यापकांची वाचनशीलता. खवले आशा हनुमंतराव, केंद्र - परभणी.

८) बसवेश्वर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची वाचनाची अभिरूची. शेख महंमद गौस, केंद्र - परभणी.

९) कोल्हापूर शहरातील वरिष्ठ महाविद्यालयातील (कला, वाणिज्य व शास्त्र) महिला शिक्षकांच्या वाचन सवयी : एक समग्र अभ्यास. घावारे बिभिषण दगडू, केंद्र - सांगली.

१०) कोकण कृषी विद्यापीठातील कृषी विद्याशाखेतील विद्यार्थिनींच्या वाचनविषयक समस्यांचा अभ्यास. रोडगे श्रीरंग मारोती, केंद्र - सांगली.

११) सांगली शहरातील लठ्ठे एज्युकेशन सोसायटीच्या वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या वाचनची सवय : एक अभ्यास. लोखंडे नारायण महादेव, केंद्र - सांगली

१२) तेलारा शहरातील विविध व्यवसाय क्षेत्रातील व्यक्तिंची वाचन अभिरूची. अग्रवाल मुक्ता, केंद्र - अकोला.

१३) अकोला तालुक्यातील अगस्ती शिक्षण संस्थेच्या माध्यमिक विद्यालयामधील शिक्षकांच्या वाचन सवयीचा अभ्यास. शालिग्राम अतुल, केंद्र - अहमदनगर.

१४) नागपूर विद्यापीठातील पदव्युत्तर इतिहास विभागातील विद्यार्थी, संशोधक आणि प्राध्यापक यांच्या वाचनाचा अभ्यास. राऊत अरूणा, केंद्र - नागपूर.

१५) मराठा विद्या प्रसारक समाजाच्या वेद्यकीय महाविद्यालयातील अध्यापकांच्या वाचनाच्या सवयी : एक अभ्यास. गावले विठ्ठल, केंद्र - नाशिक.

१६) क.का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय, ग्रंथालय नाशिकच्या शिक्षकांच्या वाचन सवयींचा अभ्यास. बोडके प्रकाश, केंद्र - नाशिक.

१७) मनमाड शहरातील सार्वजनिक ग्रंथालयातील ज्येष्ठ नागरिकांच्या वाचन सवयींचा अभ्यास. शिरसाट रमेश, केंद्र - नाशिक.

१८) चांदवड तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या वाचन सवयींचा अभ्यास. शिंदे माणिक, केंद्र - नाशिक.

१९) लालबहादूर शास्त्री महाविद्यालय परतूरमधील विद्यार्थ्यांतील वाचनाची सवय. जाधव सुधाकर, केंद्र - परभणी.

२०) महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या वाचन सवयी : एक अभ्यास. वाघ बी.एच., केंद्र -

सांगली.

२१) सर परशुराम महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या वाचन सवयींचा अभ्यास. पिंपोडकर प्रशांत, केंद्र - सातारा.

२२) डी.पी. भोसले महाविद्यालय, कोरेगाव येथील वरिष्ठ प्राध्यापकांच्य वाचन सवयी. पिसाळ सदाशिव, केंद्र - सातारा.

# प्रकरण २
# कृषी शिक्षण, कृषी संशोधन व कृषी महाविद्यालय, लातूर

२.१ भारतातील शेतीचा इतिहास

२.२ भारतातील कृषी शिक्षण

२.३ कृषी शिक्षणाची आवश्यकता

२.४ कृषी शिक्षणाची व्याप्ती

२.५ लातूर शहराची पार्श्वभूमी

## २.१ भारतातील शेतीचा इतिहास :

### २.१.१ नव अश्मयुगाचा काळ :

नव अश्मयुगाचा काळ इ.स. पूर्व १०,००० वर्षाचा गणला जातो. तत्पूर्वी मानव रानटी अवस्थेत होता. शेतीला व नव अश्मयुगात सुरूवात झाली असे म्हणतात. त्यावेळी लोक गाई, बैल, घोडे, वगैरे जनावरे पाळीत. या नंतरच्या म्हणजे ताम्रपाषाण युगाच्या काळात (इ.स. पू. ५००० ते ३०००) लोक शेती करून घरे बांधून स्थायिक झाले. त्या काळी शेतीत बरीच प्रगती झाली होती. मोहोंजोदडो आणि हडप्पा येथील उत्खननांवरून सिंधू संस्कृती (इ.स. पू. ३२००-२७००) ही नागरी संस्कृती होती. त्या संस्कृतीमधील लोकांचा व्यवसाय मुख्यतः शेती असून कापूस, जव, टरबूजे, खजूर फळे यांची ते लागवड करीत असावे. कापसाची निर्यात मेसोपोटेमियासरख्या देशात केली जाई.

### २.१.२ वैदिक काळ :

हा काळ इ.स.पू. २००० ते इ.स.पू. ८०० वर्षांचा गणला जातो. या काळात भारतात आर्यांचे वास्तव्य असून त्यांचा मुख्य धंदा शेती होता. ते गाई, मेंढरे पाळीत. भारतात येण्यापूर्वीपासून आर्यांना कृषीविद्या अवगत होती.

### २.१.३ बौध्दकाळ :

(इ.स.पू. ६०० ते ४००) पूर्वेकडे मगध, अंग, वायव्येकडे गांधार, पश्चिमेकडे काठेवाड, दक्षिणेकडे नर्मदा नदी अशा प्रदेशत अनेक नव्या पिकांची भर पडली होती. कृत्रिम जलसिंचन व खते यांचा वापर सुरू झाला होता. धातुकाम, दोर वळणे, टोपल्या तयार करणे, विणकाम, रंगकाम, सुतारकाम, कुंभारकाम इत्यादींच्या उल्लेखांवरून शेतीला उपयुक्त आणि शेतीवर अवलंबून असणाऱ्या व्यवसायांची वाढ झाल्याचे दिसून येते.

**२.१.४ मौर्यकाळ :**

इ.स. पू. चौथ्या शतकात भारतातील शेती उच्च कोटीस पोहोचली होती. त्यावेळी शेती विकासासाठी एक स्वतंत्र खाते होते. त्याच्या प्रमुख अधिकाऱ्यास 'सीताध्यक्ष' म्हणत. हवामानाचा त्यावेळी अंदाज घेतला जात असे आणि पाऊसही मोजत असत. कौटिल्याच्या काळात शेणखत, हाडखत, मासळीखत ही खते वापरली जात. शास्त्रीय दृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेल्या शेतीविषयक अनेक क्रिया कौटिल्यास माहित होत्या.

**२.१.५ स्मृतिकाल :**

हा काल इ.स. २०० ते इ.स. ५०० वर्षांचा समजला जातो. स्मृतिग्रंथामध्ये शेतीविषयक कायदे व राजा, वैश्य वगैरेंनी घ्यावयाची शेतीविषयक जबाबदारी याबद्दल सविस्तर माहिती आहे.

**२.१.६ गुप्तकाळ :**

(३२१-५५०) शेतीविषयक उल्लेख तत्कालीन वाङ्मयात व परकीय प्रवासी यांच्या वर्णनातून येतो. त्यावरून त्या काळी भारतातील शेती खूपच प्रगतीपथावर होती हे लक्षात येते.

**२.१.७ मोगल आमदानीचा काळ :**

डब्ल्यू. एच. मोरलँड ह्या इंग्रज इतिहासकाराने केलेल्या विवेचनावरून मोगल आमदानीतील शेतीधोरणाची कल्पना येते. त्यावेळी शेती उत्पन्नाच्या एक तृतीयांश दराने कर वसूल करण्यात येई.

**२.१.८ ब्रिटिश काळ :**

ब्रिटिश आमदानीत भारतीय शेतीत जे स्थित्यंतर झाले त्याचे मूलभूत घटक जमीनधारा

पध्दतीमधील बदल व शेतीचे वाणिज्यीकरण हे आहेत. जमीनदारी व रयतवारी अशा दोन प्रमुख धारापध्दती ब्रिटिशांनी चालू केल्या. मोगल आमदानातील सारा गोळा करणारे जे अंमलदार होते त्यांना जमिनीचे मालक ठरविण्यात आले.

इंग्लडमध्ये औद्योगिक क्रांतीला अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात प्रारंभ झालेला होता व नव्या उद्योगधंद्यांना कच्च्या मालाची अधिकाधिक गरज भासू लागली होती. भारतातून शेतमालाच्या निर्यातीला उत्तेजन देणे, हे ब्रिटिश सरकारच्या धोरणाचे प्रमुख तत्त्व बनले. सार्वजनिक बांधकाम खातो नव्याने सुरू करून रस्ते बांधणीचा वेग वाढविला. लोहमार्गाची बांधणी सुरू झाली व देशाचा अंतर्भागही व्यापारास खुला होऊ लागला. १८६९ मध्ये सुएझ कालवा वाहतुकीला खुला झाल्याने भारताच्या परराष्ट्रीय व्यापाराला आणखी चालना मिळाली.[१]

१७६५ ते १८०० या काळात ब्रिटिशांनी ईस्ट इंडिया कंपनी स्थापन करून त्या काळात इतर पिकांच्या लागवडीवर भर दिला. १८०० ते १९४७ या कालावधीत ब्रिटिशांनी भारतीय हवामानाचा अभ्यास केला. इ.स. १९०५ साली व्हाईसरॉय लॉर्ड कर्जन यांनी त्यांचे शिकागोतील अमेरिकन मित्र हेन्री फिप्स यांच्याकडून ३०,००० पौंडांची मदत मिळवून भारतीय शेती सुधारण्याच्या दृष्टीने पुढील बाबी केल्या. १) बिहारमधील पुसा या गावी प्रमुख संशोधन संस्थेची स्थापना, २) पुणे, कानपूर, नागपूर, साबोर, लयलपूर आणि कोईमतूर येथे कृषी महाविद्यालयाची स्थापना केली. कृषी शिक्षण व संशोधन यावर भर दिला. तेथीलच प्राध्यापकांच्या तज्ज्ञ म्हणून नेमणूका केल्या.[२]

## २.२ भारतातील कृषी शिक्षण :

वेदकालीन संस्कृत ग्रंथातील कृषीव्यवसायासंबंधी आढळणाऱ्या उल्लेखांवरून त्या काळी लोकांना शेतीची मशागत, खते, पिके, पिकांचे फेरपालट इ. बऱ्याच महत्त्वाच्या गोष्टींची माहिती होती, असे दिसून येते. परंतु कृषीशिक्षणाची सोय असल्याचे कोठे नमूद केलेले आढळत नाही. त्या काळी भारतातील कृषी व्यवसायाची भरभराट झालेली असली तरी तो व्यवसाय

परंपरागत पध्दतीनेच केला जात होता. कृषीव्यवसायात सुधारणा करण्याकरिता संशोधन प्रयोग करण्याचा आणि शिक्षण देण्याचा पुष्कळ काळापर्यंत प्रयत्न न झाल्यामुळे पुढे कृषीव्यवसायाची अवनती होऊ लागली.

ब्रिटिश राजवटीत जनतेत वाढीस लागलेला असंतोष शमविण्यासाठी ब्रिटिश राज्यकर्त्यांनी लोकांचे लक्ष शेतीसुधारणांकडे वळविले. १८६८ मध्ये मद्रासजवळील सैदापेठ येथे सरकारने एका कृषीक्षेत्राची स्थापना केली. पुढे या कृषीक्षेत्राचे कृषी शाळेत रूपांतर करण्यात आले. हीच भारतातील आधुनिक कृषी शिक्षणाची सुरूवात होय. त्यावेळेच्या मुंबई प्रांताचे राज्यपाल सर रिचर्ड टेंपल यांनी त्याच सुमारास पुण्याच्या विज्ञान विद्यालयात उच्च कृषीशिक्षणाचा अभ्यासक्रम सुरू करविला. १८८८ आणि १८९० या वर्षी अनुक्रमे नागपूर व कानपूर येथे दोन वर्षाचा महाविद्यालयीन कृषीशिक्षण अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. त्यानंतर माध्यमिक शाळांच्या अभ्यासक्रमात कृषीविषयाचा समावेश करण्यात आला. केवळ कृषीशिक्षण देण्याकरिता दोन वर्षांचा अभ्यासक्रम असलेल्या शेतीशाळाही काढण्यात आल्या. वर्गात विषयाचे सैध्दांतिक ज्ञान देऊन शाळेला जोडून असलेल्या कृषीक्षेत्रात विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष हाताने काम करवून घेतले जाई. या शाळात जमिनीचे प्रकार, जमिनीची मशागत, औते-औजारे, शेतीचे प्रकार, पिके व त्यावील रोगराई, पशुपक्षीपालन, दुग्धव्यवसाय, सुतारकाम, लोहारकाम इ. शेतीशी निगडीत असलेले विषय शिकवले जात.[३]

१९४७ साली पुणे जिल्ह्यातील मांजरी येथे एक शेती शाळा स्थापन करण्यात आली. पुढे १९४७ ते १९५५ या काळात आणखी १६ शाळा मुंबई प्रांतात निघाल्या. २० व्या शतकात भारतामध्ये कृषी महाविद्यालये स्थापन झाली. कानपूर, लयपूर, काईमतूर, नागपूर, पुणे, साबूर तसेच याच कालावधीमध्ये मुंबई (१९८६), कलकत्ता (१८९३), मद्रास (१९०३) अशी तीन पशुवैद्यकीय महाविद्यालये स्थापन झाली.

भारत सरकारच्या कृषी मंत्रालयाच्या अंतर्गत १९२९ साली रॉयल कमिशनच्या शिफारशीनुसार भारत सरकारने शेती अनुसंधान व संशोधन केंद्राची (आरसीए) स्थापन केली.

यामार्फत कृषी व कृषी संशोधन यामध्ये सुसंवाद साधण्याचे काम होऊ लागले. १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. त्यावेळेस भारतामध्ये १५ कृषी महाविद्यालये व ३ पशु वैद्यकीय महाविद्यालये अस्तित्वात होती. या महाविद्यालयामध्ये १५०० विद्यार्थी संख्या समाविष्ट करण्याची क्षमता होती. ही सर्व महाविद्यालये वेगवेगळ्या राज्य सरकारनी चालू केली होती. केंद्र सरकारच्या कृषी विभागाच्या नियंत्रणाखाली ही महाविद्यालये चालविली जात होती. या सर्व महाविद्यालयांमध्ये पारंपारिक कृषी शैक्षणिक उपक्रम राबविला जात होता. या महाविद्यालयांची संलग्नता पारंपारिक विद्यापीठांशी होती. १९४७ सालापर्यंत भरपूर संस्था कृषी विषयी काम करीत होत्या; पण त्यामध्ये सुसुत्रता व सुसंगती नव्हती.

१९४७ सालानंतर असे निदर्शनास आले की शेतीमध्ये सुधारणा झालेली नाही. याचे प्रमुख कारण कृषी महाविद्यालयामध्येच सुधारणा झालेली नव्हती. ज्या प्रमाणात या विभागामध्ये खर्च झाला त्या प्रमाणात कृषी संशोधन व कृषी महाविद्यालये यामध्ये प्रगती झालेली नव्हती. आपल्या देशामध्ये अन्नधान्याच्या बाबतीत वाढ झाली तरच देशाची प्रगती होऊ शकेल, म्हणून याच काळात शास्त्र व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शेतीमध्ये सुरू झाला.

१९४८-४९ साली नेमलेल्या डॉ. राधाकृष्णन समितीने ग्रामीण विद्यापीठांची स्थापना करण्याची शिफारस केली. १९५५ साली नेमलेल्या प्रथम व १९५९ साली नेमलेल्या द्वितीय भारत अमेरिका अभ्यास गटानेही प्रत्येक राज्यात किमान एक कृषी विद्यापीठ अमेरिकेतील जमीन अनुदान (Land Grant) तत्त्वावर स्थापन करण्याची शिफारस केली आणि या शिफारसीनुसार देशातले पहिले कृषी विद्यापीठ पंत नगर येथे स्थापन झाले. १९६० ते १९७५ या कालावधीत देशातील बहुतेक राज्यात कृषी विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. या कृषी विद्यापीठांवर भारतीय कृषी अनुसंधान परषिद, नवी दिल्ली (ICAR) चे नियंत्रण आहे. भारत सरकारकडून १०० टक्के अनुदान मिळते व या अनुदानाचा वापर कृषी शिक्षण, कृषी संशोधन व कृषी विस्तार यासाठी केला जातो.

## २.३ कृषी शिक्षणाची आवश्यकता :

जगातील विविध व्यवसायाचा आढावा घेत असे दिसून येते की, मानवाने सर्वप्रथम कृषी हा व्यवसाय म्हणून सुरू केला. त्यानंतर कृषी मालाच्या आधारावर इतर व्यवसाय उभे राहिले. त्यात साखर व कापूस व्यवसायाचा समावेश मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दिसून येते. विविध व्यवसायाच्या उत्पत्तीनंतर शेती मालाच्या मागणीत प्रचंड वाढ होत जाऊन शेती मालाचे उत्पादन वाढण्यासाठी प्रयत्न झाले आणि कृषी शिक्षणाची आवश्यकता प्रकर्षाने भासू लाभली.

कृषी क्षेत्रात क्रांतीचे दोन टप्पे प्रमुख मानले जातात. १७ वे शतक हे कृषी क्रांतीचे शतक म्हणून जगभर प्रसिध्दीस आले. कारण या शतकात बरेच नवनवीन शोध लागले. १) सुधारित पध्दतीने पिकांची लागवड करणे. २) चांगल्या जातीची जनावरे निर्माण करणे. ३) शेतीसाठी नवीन औते-औजारे निर्माण करणे यावर भर दिला.[४] याच कालावधीमध्ये रोम येथे मूलभूत शोध लागले. त्यात विविध पीक पध्दतींचा अभ्यास, कडधान्यानंतर तृणधान्ये घेणे, जमिनीची सुपिकता टिकविणे या प्रकारच्या अभ्यासाव्यतिरिक्त कृषी क्षेत्रातील यंत्र सामुग्री निर्मितीवर भर देण्यात आला. सुरूवातीच्या काळात कृषी बाबात जे शोध लागले ते रोम येथून जगातील विविध ठिकाणी त्यांचा प्रचार आणि प्रसार झाला. त्यामुळे कृषी शिक्षणाची आवश्यकता भासू लागली. लायबीग (Libig) या शास्त्रज्ञाने पिकांना वाढीसाठी अन्नद्रव्यांची गरज असते असे १८७० सालाचे दरम्यान सिध्द केले.[५] तर अरनॉन या शास्त्रज्ञाने नत्र घटकांची आवश्यकता असते हे दाखवून दिले. त्यामुळे कृषी क्षेत्रातील संशोधनास पिकांच्या वाढीसाठी लागणाऱ्या अन्नद्रव्य घटकांच्या शोध मोहिमेस सुरूवात झाली. पिकांच्या वाढीसाठी १६ अन्नद्रव्यांची नितांत गरज असते असे सिध्द केले.

इ.स. १७०० सालाच्या सुमारास रासायनिक खते, कीटक नाशके, तण नाशके यांचे शोध लागले. १८०० सालाच्या सुमारास पिकांना आवश्यक असणाऱ्या अन्नद्रव्यांचे शोध लागले. प्रथम नायट्रोजनचे रासायनिक खत तयार करण्याचा कारखाना १९०५ साली तर स्फुरद खत तयार करण्याचा कारखाना १९१३ साली जर्मन शास्त्रज्ञ फ्रिट्झ हॅबर याने जर्मनीत सुरू केला.

पुढे रासायनिक खतांचा वापर १९६० ते १९८० या काळात सर्व जगात दुप्पट झाला.[६]

पाणी व्यवस्थापन क्षेत्रात इस्त्रायल तंत्रज्ञान की ज्यामध्ये ठिबक सिंचन ही पाणी देण्याची आधुनिक पध्दती अवगत झाली आणि तिचा प्रचार आणि प्रसार सर्व जगभर मोठ्या प्रमाणात झाला. पाणी व्यवस्थापनाच्या शास्त्रामध्ये धरणे बांधून कॅनॉलद्वारे पाणी पुरवठा करणे आणि उत्पादन वाढविणे यावर भर दिला जाऊ लागला. तथापि कमी पाण्यात अधिक उत्पादन करण्यासाठी ठिबक सिंचन ही पध्दती अग्रेसर ठरली.

भारतास जेव्हा स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी भारताची लोकसंख्या ४० कोटी होती आणि देशात केवळ ५१ दशलक्ष मेट्रिक टन अन्नधान्य उत्पादन होत होते. हे उत्पादन देशातील लोकसंख्येला पूरक नव्हते. त्यामुळे हरित क्रांतीची सुरूवात १९६० सालानंतर झाली आणि अन्नधान्य उत्पादन वाढविण्यासाठी नवनवीन जातीचा वापर केला गेला. त्यात डॉ. नॉर्मन बोर्लाग या मेक्सिकन शास्त्रज्ञाने विकसित केलेल्या गव्हाच्या जातीचे वाण सरस ठरले.[७]

भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतातील ७० टक्के लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच आहे. शेती व्यवसायात परंपरेने चालत आलेल्या पध्दतीने पारंपरिक शेती पध्दती मोठ्या प्रमाणात वापरली जात असे. पारंपारिक शेती पध्दतीने जंगले तोडून त्या जमिनीचा वापर शेती करण्यासाठी केला गेला. अशा शेतीमध्ये दरवर्षी तीच पिके घेऊन शेती हा व्यवसाय केला जात असे. त्यामुळे देशामध्ये गरिबी मोठ्या प्रमाणात दिसून येत होती. बहुतांशी शेती ही पावसाच्या पाण्यावर केली जात असे. इ.स. १९०० साली लंडन टाईम्समध्ये भारतातील मान्सून बद्दल बरेच विवेचनात्मक लिखाण झाले. त्यात म्हटले आहे की, भारतातील मान्सून वारे भारतात पाऊस आणतात. परंतु हा पाऊस बऱ्याचदा अपुरा, अवेळी आणि असमाधानकारक पडतो. त्यामुळे भारतात अधुनमधून दुष्काळ जाणवतात.[८] दुष्काळाचा अभ्यास करण्यासाठी १८६६ मध्ये नेमलेल्या आयोगाने शेतीखाते उघडावे, अशी शिफारस केल्यावर प्रथमच १८७१ साली जमीन महसूल व व्यापार यांचे संयुक्त खाते स्थापन झाले. तसेच हवामान विषयाच्या अभ्यासाची आवश्यकता दिसून आल्याने त्या खात्याची सुरूवात १८०० मध्ये झाली. त्याच सुमारास भारतामध्ये

ब्रिटिशांनी शेती विषयक शिक्षणाची आवश्यकता विषद केली आणि कृषी खात्याची स्थापना १८६६ साली केली.

१८८१ सालापासून शेतीसंबंधी अशा निरनिराळ्या विषयांवरील तज्ज्ञांच्या नेमणूका होऊ लागल्या आणि कृषी संशोधन व कृषी शिक्षण याचा विस्तार करण्यात आला. १९०५ साली बिहारमध्ये पुसा येथे प्रमुख संशोधन संस्थेची स्थापना करण्यात आली. ब्रिटिश राजवटीत जनतेत वाढीस लागलेला असंतोष शमविण्यासाठी ब्रिटिश राज्यकर्त्यांनी लोकांचे लक्ष शेती सुधारणांकडे वळविले. १९६८ मध्ये मद्रास जवळील सैदापेठ येथे सरकारने एका कृषीक्षेत्राची स्थापना केली. पुढे या कृषीक्षेत्राचे कृषी शाळेत रूपांतर करण्यात आले. हीच भारतातील आधुनिक कृषी शिक्षणाची सुरूवात होय. इंग्लडमध्ये औद्योगिक क्रांतीला १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात प्रारंभ झालेला होता व नव्या उद्योगधंद्यांना कच्चा मालाची अधिकाधिक गरज भासू लागली होती. भारतातून शेतमालाच्या निर्यातीला उत्तेजन देणे हे ब्रिटिश सरकारच्या धोरणाचे प्रमुख तत्त्व बनले.

कृषी शिक्षणापासून जोपर्यंत शेतकरी दूर राहिला तोपर्यंत पारंपारिक शेती करत असे आणि त्यामुळे शेतीमध्ये बदल आणि आधुनिक पध्दतीने लागवडी केल्या जात नसत. याचा परिणाम शेती उत्पादनावर होऊन शेती किफायतशीर होत नसे. परंतु शेती शिक्षणाच्या प्रसारानंतर उत्तम शेती ही संज्ञा प्रचारात आली. यावरुन असे स्पष्ट होते की, कृषी क्षेत्रात शिक्षणाची नितांत गरज असून ते जेव्हा पाहिजे तेव्हा आणि जेथे हवे तेथे दिले गेले पाहिजे. कृषी विद्यालयातील शैक्षणिक अभ्यासक्रम हा कृषी शिक्षणाची गरज भागविते तर शेती शाळाचा अभ्यासक्रम हा पायाभूत शेती ज्ञानाची गरज भागविते. हे कृषी शिक्षणाचे भाग २० व्या शतकामध्ये प्रामुख्याने विकसित करण्यात आले. यापूर्वी जगभरात चाललेल्या नवनवीन कृषी क्षेत्रातील घडामोडी संदर्भात कृषी शिक्षणाचे महत्त्व आणि आवश्यकता ही कशा प्रकारे भासत गेली यांची सांगोपांग माहिती मिळते. आता कृषी क्षेत्रात पदव्युत्तर शिक्षण, शिक्षणाच्या विविध शाखा विकसित झ ाल्या असून त्या ठिकाणी मेरिट (गुणवत्तेनुसार) प्रमाणे प्रवेश प्रक्रिया पार पाडते. कृषी शिक्षणाची

आवश्यकता ही उत्तम शेती व्यवसाय करण्यासाठी शेती विषयक जोडधंदे करण्यासाठी उच्च शिक्षण घेऊन संशोधन क्षेत्रात नोकरी करण्यासाठी निश्चितच आहे.

प्रत्येक राष्ट्राला कृषी शिक्षणाचीही सोय करावी लागते. शेतकऱ्यांमध्ये ज्ञानाचा प्रसार होणे हा शेतीच्या प्रगतीचा पाया आहे. भौतिक शास्त्रातील ज्ञानाची शेतीच्या उत्पादनाशी सांगड घालावी हे शेतकऱ्यांना ज्ञानाचा प्रसार झाला म्हणजेच पटू लागते. यासाइी शेतकऱ्यांना केवळ लेखन, वाचन व आकडेमोड एवढेच ज्ञान असून चालणार नाही. त्यांना विज्ञानाच्या निरनिराळ्या शास्त्रांच्या प्राथमिक स्वरूपाचे ज्ञान मिळाले पाहिजे व विशेषतः त्या शास्त्रचा शेतीवर काय परिणाम होतो हे समजावून दिले पाहिजे. आधुनिक शास्त्रीय संशोधनाचा कृषी उत्पादन वाढविण्यासाठी कसा उपयोग करून घेता येईल याचे ज्ञान त्यांना सोप्या भाषेत मिळण्याची व्यवस्था झाल पाहिजे. शेतीविषयी उच्च शिक्षणाची जबाबदारी कृषी महाविद्यालये आणि कृषी विद्यापीठे यांच्याकडे आहे. त्याचप्रमाणे कृषी विषयक संशोधन, ज्ञानप्रसार व विस्तार कार्यक्रम ही कृषी विद्यापीठांना करावी लागातात.[९]

कोणत्याही विषयाच्या प्रक्रियेतील प्रत्येक घटक हा त्या प्रक्रियेमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या कार्यकुशलतेमध्ये झालेल्या सुधारणेवर अवलंबून असतो आणि कार्यकुशलतेमधील सुधारणा ही शिक्षणामुळे घडून येते. साहजिकच कार्यकुशल कामगारांची दुर्मिळता ही एक शेतीविकास कार्यक्रमातील अडसर ठरतो. कित्येक वेळा शेती विकासासाठी योग्य असलेले कार्यक्रम अपेक्षित असे यश देत नाहीत. त्याला कारण म्हणजे अशा कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेत जे लोक कारणीभूत असतात त्यांना योग्य प्रकारचे कृषी शिक्षण मिळालेले नसते.[१०]

वरील सर्व कालावधीत कृषी शिक्षणाची आवश्यकता भासली आणि त्यामुळेच शिक्षणासाठी महाविद्यालये तर संशोधनासाठी संशोधन केंद्र निर्मितीवर भर देण्यात आला.

### २.४ कृषी शिक्षणाची व्याप्ती :

विज्ञान या विषयात सुरूवातीच्या काळात कृषी हा विषय समाविष्ट होता. पुढे विज्ञान

शाखेचे तीन भाग करण्यात आले. ते म्हणजे शास्त्र, कृषी अभियांत्रिकी त्याप्रमाणे कृषी हे स्वतंत्रपणे शास्त्र म्हणून इ.स. १९०५ सालच्या दरम्यान गणले गेले. सुरूवातीला B. Ag. ही पदवी दिली जात असे. पुढे B. Sc. कृषी ही पदवी दिली जाऊ लागली. या विषयात कृषी विद्या, उद्यान विद्या, कृषी वनस्पती शास्त्र, वनस्पती विकृती शास्त्र, कीटक शास्त्र, अर्थशास्त्र, कृषी विस्तार आणि जनावरांचे पालन व दुग्ध व्यवसाय या विषयीचे शिक्षण दिले जात असे. पुढे जनावरांचे आजार आणि रोग या बाबतचा विषय समाविष्ट करण्यात आला आणि कृषी शिक्षणाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत गेली. प्रत्येक विषयाला स्वतंत्र प्राप्त झाले. पुढे या विषयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू झाले. या अभ्यासक्रमामध्ये उच्च शिक्षण घेऊन कृषी खाते अथवा विद्यापीठात शेती विषयक कार्य अथवा संशोधनाद्वारे व्याप्ती वाढत गेली. कृषी विस्तारांच्या कार्यात शेतीकडून प्रयोगशाळेकडे व प्रयोगशाळेतून शेतीकडे ज्ञानाचा ओध सुरू झाला. त्यामुळे व्याप्ती वाढतच गेली.

आज देशामध्ये एकूण ३४ कृषी विद्यापीठे कार्यरत आहेत, तर एकूण १२१ कृषी महाविद्यालये, ४० पशुवैद्यकीय महाद्यिालये, २४ कृषी अभियांत्रिकी महाविद्यालये, २० होम सायन्स महाविद्यालये, १५ उद्यान विद्या महाविद्यालेय, १६ वनरक्षण विद्या महाविद्यालेय, १७ मच्छशिक्षण महाविद्यालेय, ११ अन्नतंत्र व डेअरी महाविद्यालये अशा प्रकारे दिवसेंदिवस व्याप्ती वाढत जाऊन कृषी शिक्षणाचे जाळे भारतभर पसरले.[११]

कृषी शिक्षणाबरोबरच कृषी शिक्षणाची व्याप्ती वाढत गेली. सर्व पिकांचे संशोधन आणि व्याप्ती पाहाता संशोधनासाठी संशोधन केंद्रे कार्यरत असून त्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढतच आहे.

पिकांमधील संशोधनात कमी काळातील अधिक उत्पादन देणारे काही वाण विकसित करण्यास शास्त्रज्ञांना यश आले. अशा वाणांचे बीज उत्पादन व त्यासाठी पूरक शिक्षण या सर्वांची गरज भासून व्यापक दृष्टिकोन ठेवून या सर्व प्रकारच्या शिक्षणाची व्याप्ती वाढतच आहे.

कृषी शिक्षणामध्ये कृषी पदवीका या भागास अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. कृषी पदवीका अभ्यासक्रमाची केवळ दोन वर्षांचे कोर्सद्वारे बीज विक्री व खत विक्रीची परवाने मिळवून स्वतंत्र रोजगाराची द्वारे खुली झाली आणि त्यात शेती व्यवसायात यश संपादन करण्यात अशा पदवीका धारकांना शक्य झाले आहे. अशा प्रकारे या शिक्षणाची व्याप्ती खेड्यांपर्यंत दूरवर पसरत गेली आहे, तर खेड्यात राहणाऱ्या शेतकऱ्यांना अशा प्रकारचे अभ्यासक्रम पूर्ण केलेले सरकारी अधिकारी किंवा महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केलेल्यांचे आशीर्वाद लाभल्याने ग्रामीण भागात कृषी क्षेत्रात उल्लेखनीय क्रांतीकारक बदल होत असल्याचे दिसते.

पाणी व्यवस्थापन यामध्ये छोटे, मध्यम व मोठे प्रकल्प तयार होऊन बागायत शेतीची व्याप्ती वाढली. बागायती क्षेत्रामध्ये जेथे एक पीक घेतले जात होते तेथे दोनहून अधिक पिके वर्षात घेतली जातात. त्यामुळे जेव्हा देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा देशातील अन्नधान्य ५ कोटी मेट्रिक टन होते. तेवढे उत्पादन देशाच्या शिल्लक साठ्यामध्ये असून दरवर्षी २० कोटी मेट्रिक टन अन्नधान्य उत्पादन होत आहे. याशिवाय १४ कोटी मेट्रिक टन भाजीपाल्याचे उत्पादन होत आहे. त्यामुळे  भारतातील शेती ही जशी पाऊसमानावर अवलंबून होती तेव्हा तो प्रश्न गंभीर मानला जात होता. परंतु आता अन्नधान्य व भाजीपाला उत्पदनाला भाव येण्यासाठी त्याचे अर्थशास्त्र हाही गंभीर विषय होत आहे. डॉ. स्वामीनाथन म्हणतात, "शेतजमीन ही नेहमीच तहानलेली आणि भुकेली असते. त्यामुळे तिला पोषक खते आणि पाणी देणे गरजेचे आहे. मात्र त्यांचा मारा केला जाऊ नये. तसे केल्यास जमिनीचे आरोग्य विघडते."[१२]

जनावरांच्या बाबतीत विविध संकरित जनवरांची पैदास झाली तसेच संकरित व देशी गाईंच्या संकरापासून पुढे त्रिवेणी गाय झाली. इथपर्यंत संकर करून दूध उत्पादनात क्रांती होऊन त्याची व्याप्ती वाढतच आहे. गुजरातमधील आनंद पॅटर्न, अमूल दूध व्यवसायिकांनी अमुलाग्र व्याप्ती वाढवून दुधाचे पदार्थ भारतभर विक्री करण्याचे व्यापक प्रयत्न केले, तर कुकुटपालन व्यवसायात व्यंकटेश्वरा हॅाचरिज, पुणे यांनी आशिया खंडात नाव लौकिक प्राप्त केला. अशा प्रकारे कृषी व्यवसायात एक ना अनेक नमुदनेदार उहारणे देता येतील इतकी प्रत्येक क्षेत्रात

व्याप्ती वाढत असून कृषी क्षेत्राची व्याप्ती अगणित होईल असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. या क्षेत्राची व्याप्ती वाढण्यास अद्यापही प्रचंड वाव असून भविष्यकाळात आंतरदेशीय बाजारपेठेत चांगल्या प्रतीचा माल पाठविण्यात देशातून प्रयत्न होतील आणि भारतातील शेती माल परदेशीय बाजापेठांमध्ये नाव मिळवेल. आजही चहा, साखर, कॉफी, मसाल्याचे पदार्थ, आंब्यामधील हापूस, द्राक्षांमधील सिडलेस जाती हे सर्व परदेशीय बाजारपेठेमध्ये विकले जाऊ लागले आहेत. अशा प्रकारे कृषी क्षेत्राची व्यापकता अगाध असून भविष्यकाळात ती अधिक विकसित होऊन व्याप्तीत दिवसेंदिवस भर पडत जाईल, असे अनुमान निघते.

### २.५ लातूर शहराची पार्श्वभूमी :

लातूर शहरास ऐतिहासिक परंपरा आहे. इ. स. पूर्व १४३-८६ या काळात सातवाहन वंशातील राजा दुसरा सातकर्णी याचे अधिपत्य या भागावर होते.

इ. स. ५३५-५५७ या काळात हे शहर बदामीच्या चालुक्यांच्या ताब्यात होते. चालुक्यांचा एक सामंत आणि राष्ट्रकुट घराण्याचा मुळ पुरूष दंतीदुर्ग याचा उल्लेख ताम्रपटात महासामंताधिपती व समाधीगत पंचमहाशब्द या बिरूदांनी केला आहे. काही ताम्रपटात लट्टलूर असा लातूरचा उल्लेख आढळतो.

चालुक्यानंतर राष्ट्रकुटाने येथे साम्राज्य स्थापन केले. (इ.स. ७१३ - ७५८) राष्ट्रकुट राजे स्वतःला लट्टलूरपूराधीश हे बिरूद लावीत.

पहिल्या अमोघ वर्षाच्या सिरूर आणि निलगुंड ताम्रपटावरून लट्टलूर हे उत्तम शहर असल्याचा उल्लेख मिळतो. राष्ट्रकुटानंतर पहिला, दुसरा व सहावा विक्रमादित्य (इ.स. १०७६-११२६) या राजाने लातूर शहर तथा या परिसरावर अनेक वर्ष राज्य केले.

तिसरा सोमेश्वर सर्वज्ञ चक्रवर्तीचा इ. स. ११२८ चा एक कोरीव लेख लातूर येथे सापडला असून त्यामध्ये लातूरचा लट्टलूर असा नामनिर्देश आणि पापविनाश मंदीर बांधल्याचा उल्लेख सापडतो.

राष्ट्रकुट व चालुक्यांचे मांडलीक असलेल्या यादव घराण्याने (इ.स. ११८५-१३१८) येथे राज्य केले. अल्लाउद्दीनचा मुलगा मुबारक यांनी इ.स. ११३८ मध्ये यादवांचे राज्य नष्ट करून दिल्लीच्या सुलतानशाहीने हा भाग जिंकला. त्यानंतर बहमन सत्ता (इ.स. १३४७ ते १५३८) आदिलशाही (इ.स. १५३८ ते १६८६) व निजामशाही यांच्या अधिपत्याखाली हा प्रदेश होता.

अदिलशहा असताना शहाजहानने उदगीरचा किल्ला घेऊन (इ.स.१६३६) भोवतालचा प्रदेश जिंकला त्यानंतर औरंगजेब दक्षिणेच्या स्वारीवर येऊन आदीलशाही नष्ट करून मोगलांचा अंमल बसविला. इ.स. १५२४ च्या लढाईत निजाम-उल-मुल्क यांनी मुवारीझ खान याचा पराभव करून हा भाग जिंकला. त्यानंतर मराठे व निजाम यांच्यात वारंवार संघर्ष होत राहिला. भारत स्वतंत्र होईपर्यंत हा प्रदेश निजामाच्या ताब्यात होता. इ. स. १८५३ मध्ये हा प्रदेश निजामाने ब्रिटीशांना दिला. इ.स. १९०४ पर्यंत नळदुर्ग व उस्मानाबाद जिल्ह्यात हा भाग होता. इ.स. १९०५ साली औसा येथील तालूका कार्यालय लातूर येथे हलविण्यात आले. हैद्राबाद संस्थानाच्या विलीनीकरणाने (इ.स.१९४८) लातूरचा समावेश तत्कालीन मुंबई इलाख्यात करण्यात आला. इ.स. १९५६ च्या राज्य पूनर्रचनेनंतर मुंबई द्विभाषिक राज्यात व इ.स. १९६० नंतर महाराष्ट्र राज्यात करण्यात आला. इ.स. १९६० ते १९८२ पर्यंत लातूर उस्मानाबाद जिल्ह्यात होते. १६ ऑगस्ट १९८२ रोजी उस्मानाबाद जिल्ह्याची विभागणी करून नवा लातूर जिल्हा अस्तित्वात आला.

सांस्कृतिक वारसा लाभलेल्या लातूर शहरास शैक्षणिक इतिहास फार मोठा आहे. शैक्षणिक क्षेत्रात लातूर शहराने संपूर्ण महाराष्ट्रात 'लातूर पॅटर्न' निर्माण केला आहे.

लातूर शहर हे मराठवाड्यातील विद्येचे माहेरघर मानण्यात येते. त्याची तुलना शैक्षणिक सुविधांच्या बाबतीत पुण्याशी केली जाते.

शहरातील शैक्षणिक वातावरण अतिशय दर्जेदार असून इयत्ता १० वी व १२ वीच्या बोर्डाच्या गुणवत्ता यादीत लातूर शहराने निर्विवाद वर्चस्व कायम ठेवले आहे. शहरात राजर्षी

शाहू महाविद्यालय, दयानंद महाविद्यालय, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय आहेत. तसेच अभियांत्रिकी महाविद्यालय, आयुर्वेद महाविद्यालय, दोन वैद्यकिय महाविद्यालय, दोन तंत्रनिकेतने, डी. फार्मसी, बी.एड., डी. एड. इत्यादी महाविद्यालये आहेत.

लातूर जिल्ह्यामध्ये एकूण १० तालुके आहेत ते पुढीलप्रमाणे - लातूर, शिरुर अनंतपाळ, देवणी, जळकोट, निलंगा, रेणापूर, औसा, अहमदपूर, चाकूर, उदगीर.

**लातूर जिल्ह्याचे वैशिष्ट्ये :**

१) श्री. सिध्देश्वर मंदीर, लातूर.

२) श्री. निलकंठेश्वर मंदीर, निलंगा.

३) श्री. क्षेत्र अनंतपाळ मंदीर, शिरुर अनंतपाळ.

४) रेणूकादेवी मंदिर व दीपमाळ, रेणापूर.

५) श्री. हावगीस्वामी मंदीर, उदगीर.

**लातूर जिल्ह्याचे ऐतिहासिक स्थळे :**

१) खरोसा लेणी, औसा.

२) औसा किल्ला, औसा.

३) उदगीर किल्ला, उदगीर.

**लातूर जिल्ह्याचे शैक्षणिक महाविद्यालये :**

१) राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

२) दयानंद महाविद्यालय, लातूर

३) महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

४) उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

५) कृषी महाविद्यालय, लातूर

# प्रकरण तिसरे
# वाचन

३.१ प्रस्तावना

३.२ मानवी जीवनामधील वाचनाचे महत्त्व

३.३ स्वयंअध्ययनात वाचनाचे प्रकार

३.४ वाचन प्रक्रियेतील घटक

३.५ वाचनाची वैशिष्ट्ये

३.६ चुकीच्या वाचन सवयी

३.७ वाचन सुधारावयाचे कसे

३.८ पुस्तके आणि विद्यार्थी यांचा संबंध

३.९ काय वाचावे आणि कसे वाचावे

३.१० वाचन कौशल्य

३.११ वाचनपूर्व तयारीचे महत्त्व

३.१२ प्रसार माध्यमांचा परिणाम

### ३.१ प्रस्तावना :

वाचन म्हणजे काय हे सांगण्यासाठी वेगवेगळ्या लेखकांनी वेगवेगळ्या व्याख्या केलेल्या दिसून येतात.

१. वाचलेल्या मजकुराचा अर्थ समजला म्हणजे चांगले वाचता आले असे नव्हे तर वाचनाच्या हेतुनुसार शक्य तितक्या वेगाने वाचणे आणि वाचलेला भाग उत्तम प्रकारे समजणे म्हणजे चांगले वाचन हाहेय.

२. व्यक्तित्वसंपन्नतेचे ध्येय साध्य करण्याचे एक प्रभावी साधन म्हणजेच 'वाचन' या संदर्भात "All that mankind has done, thought, gained or been is lying as in magic preservation in the pages of books." हे कार्लाइलचे वचन लक्षात ठेवण्यासारखे आहे.

३. अनेक कौशल्यांचा भरदस्त मे (elegant blend) म्हणजे वाचन.

४. "Reading involves the indentification and recognition of printed or written symbols which serve as stimuli for the recall of meanings built up through past experience, and further the construction of new meanings through the reader's manipulation of relevant concepts already in his possession. The resulting meanings are organized into thought processes according to the purposes that are operating in the reader. Such an organization results in modifications of thought, and perhaps of behavior, or it may even lead to radically new behavior which takes place in the personal or social development of the individual." by Tinker, M.A. and McCullough, C.M. in Teaching elementary reading.

५. वाचन म्हणजे लिपिबध्द खुणा (अक्षरे / शब्द / वाक्ये इत्यादी) ओळखणे, त्या खुणाचे उच्चार करणे, त्यांचा अर्थ समजावून घेणे. त्यावर वेगवेगळ्या प्रकारे प्रतिक्रया व्यक्त करणे आणि जे पटेल त्यानुसार वर्तमान बदल करणे.

६. वाचन या शब्दाचा अर्थ वाचन (स.न.) पठणक्रिया, वाचलेले ग्रंथ वाचन म्हणजे काय? अक्षरे वाचता येणे योग्य प्रकारे नेत्राची हालचाल होणे अगर परिग्रहणाचा वेग वाढणे या गोष्टी वाचन क्रियेच्या प्राथमिक अवस्थेत अत्यंत महत्त्वाच्या असल्या तरी काही वाचन क्रियेचे अंतिम ध्येय ठरू शकत नाहीत.

७. Goldman and Gray यांची वाचनाबद्दलची पुढील अवतरणे लक्षात घेण्याजोगी आहेत. "The purpose of reading is the reconstruction of meaning. The meaing is not in print, but it is meaning that the author begins with when he writes. some how the reader strives to reconstruct this meaning as the reads."

"A Good reader understands not only meaning of a passage, but its related meaning as well, which includes all the reader knows that enriches of illumines the literal meaning. Such knowledge may have been aucquired through direct experience, through wide reading, or throuhg listening to others."

लेखकाचे शब्द आणि वाचकांच्या प्रक्रिया यांचा मिलाफ म्हणजेच खऱ्या अर्थी वाचने थोडक्यात असे सांगता येईल कि "माणूस परिपूर्ण बनविण्याची प्रक्रिया म्हणजे वाचन होय." वाचन म्हणजे केवळ छापलेला किंवा लिहिलेला मजकूर डोळ्यांनी पाहून ओळखणे एवढेच नाही. त्याचा योग्य अर्थ देखील समजणे आवश्यक असते. त्यामुळे वाचनामध्ये अक्षरज्ञान, अक्षर व आवाज यातील परस्परसंबंध, वाचणाऱ्यांचा भाषिक अभ्यास,

हेत यासारख्या अनेक घटकांचा समावेश होतो. म्हणजेच वाचन केल्यानंतर त्यातील आशयाचे आकलन होणे तसेच त्यातील उद्दिष्टानुसार कृती किंवा क्रिया घडणे आवश्यक असते. थोडक्यात वाचन म्हणजे लिहिणाऱ्याच्या हेतुनुसार वाचण्याच्या तयारीप्रमाणे होणारे अर्थाचे आकलन.

## ३.२ मानवी जीवनामधील वाचनाचे महत्तव :

"वाचन आहे प्रवास सुंदर नव्या ज्ञानाचा इतिहासाचा, साहित्याचा आणिक विज्ञानाचा" मंगेश पाडगावकर कवीने किती योग्य वर्णन केले आहे. जीवनाचे एक अविभाज्य अंग म्हणून आज वाचनाकडे पाहिले जाते. विज्ञान युगात व्यक्तीचा दिवस वाचनापासूनच सुरू होतो व वाचनानेच संपतो. सकाळी उठल्यावर ज्याप्रमाणे गरम-गरम चहा पिण्याची सवय असते. तशीच वर्तमानपत्र वाचल्याशिवाय आधुनिक माणसाला चैन पडत नाही. चहा बरोबर वर्तमानपत्र वाचणे हे आता नित्य कर्माचाच एक भाग बनले आहे. तस पाहिले तर वाचनशिवाय आजचे जीवन म्हणजे अंधारात प्रवास केल्यासारखे आहे. वाट चुकलेल्या जहाजाप्रमाणे व्यक्ती कुठल्याही दिशेला भरकटत जाते. वाचनामुळे त्याच्या विचारांना प्रवृत्तीला योग्य दिशा मिळते.

स्वत:चे शरीर सुदृढ होण्यासाठी शारीरीक व्यायामाची गरज असते. त्याप्रमाणे व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी वाचनाची गरज असते. जीवनात आकाशाची स्वच्छता, नदीची प्रसन्नता व सागराची गंभीरता हवी असेल तर वाचन करणे ही काळाची गरज आहे. थोर पुरूषांची व आत्मचरित्रे आपल्या व्यक्तिमत्त्व विकासाला पोषक अशी परिस्थिती निर्माण करतात. जग बदलण्याची किमया पुस्तकांमध्ये आहे.

वाचनामुळे ज्ञानात भर पडते, भाषेला बळण प्राप्त होते. आपल्या विचारांना स्पष्टता येते. विचार, कल्पना, भावना यांच्या अभिव्यक्तीचे सामर्थ्य वाढीस लागते. विचारांचे संक्रमण घडते. वाचनाने आपल्याला माणसाच्या आतला खरा माणूस कळतो. वाचनातून मिळणारा आनंद अदभुत असतो. त्यात तुम्हाला कोणाच्या सहकार्याची गरज नतसे. तुम्ही आणि तुमचे पुस्तक म्हणजे सूर्य आणि त्याचा प्रकाश.

अभ्यासाचे प्रमुख साधन वाचन हेच आहे. कोणताही कुशल कारागीर आपली हत्यारे नेहमीच सुसज्ज ठेवतो. त्याचप्रमाणे आपले वाचन उत्कृष्ट आणि अद्ययावत असले पाहिजे. आधुनिक जगातील स्वयंविकासाचे एक महत्त्वाचे साधन म्हणजे वाचन. वाचन हा विरंगुळा ही आहे. वाचनाची सवय लागली म्हणजे त्यांच्या जीवनातील मानसिक उदासीनता दूर होण्यास मदत होते. त्यामुळे मन आनंददायी बनते. वाचकांच्या अंगी दुःख पचवण्याची शक्ती निर्माण होते. म्हणजे चांगला वाचक हा आपली भावनिक व बौध्दिक भूक वाचनाने भागवितो.

वाचनाचा समाज जीवनावरही परिणाम होतो. चांगल्या वचनाच्या सवयी माणसाला शुद्र जाणिवांच्या पलिकडे घेऊन जातात. मोठमोठ्या देशांची जी आपणास प्रगती झालेली दिसते. ती त्या देशातील वाचनप्रियता हे एक प्रमुख कारण सांगता येईल. औपचारिक अभ्यासक्रमाच्या माध्यमातून शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी सवय ही शालेय वयापासूनच आत्मसात करावी लागते. म्हणूनच या वयात 'प्रसंगी अखंडीत वाचीत जावे' असा संस्कार सद्‌गुरूव सुजाण पालक आपत्यावर करीत असतात.

मानवी जीवनात वाचनाला फार महत्त्व आहे. वाचनाचा नाद लागलेल्या मनुष्याचे जीवन सुखसमाधाने जाते. वाचनामुळे त्याचे वैयक्तिक जीवन समृध्द व्हायला मदत होते. म्हणून माणसाच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासासाठी वाचन ही एक आवश्यक गोष्ट आहे. म्हणून 'वाचाल तर वाचाल' असे म्हटले जात आहे.

वाचनाचे महत्त्व सांगणारे अनेक विचारवंत होऊन गेले. कै. गोपाळ गणेश आगरकरांनी वाचनाचे महत्त्व सांगताना असे म्हटले आहे, "ज्याला एकदा चांगल्या वाचनाचा नाद लागला त्याच्या करमणुकीला सीमा नाही. ज्याला आपल्या काळा सोडून भूतकाळात किंवा भविष्यकाळात प्रवेश करावयाचा असेल, त्याला पृथ्वीवरील आजपर्यंत कोणत्याही देशात झालेले मोठमोठे तत्त्ववेते, कवी, नाटककार यांचा समागम करून ज्ञानमृताचे सेवन करावयाचे असेल त्याला वाचनाखेरीज दुसरे साधन नाही."

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी आपल्या निबंधमालेतील 'वाचन' या निबंधात वाचनाचे फायदे विशद करताना म्हटले आहे, "वाचनाचा पहिला मोठा उपयोग म्हटला म्हणजे त्याच्या योगाने चित्ताचे रंजन होऊन दुसऱ्या करमणुकीच्या उपयांची गरज राहात नाही. खरा रसिकच विद्वान हा आपल्या पुस्तकालयात बसून ग्रंथवाचनात निमग्न झाला असता त्यास त्या वेळेस जे सुख होत असेल ते मोठ्या सार्वभौम राजास भर दरबारात सिहांसनावर बसल्यावरही मिळत नसेल. वाचनापासून ज्ञानप्राप्ती होते ते सांगण्यासाठी त्यांनी त्यांच्या शैलीत म्हटले आहे, "जेवण जसे सावकाश नेमस्तपणे व नियमाने असे केले असता अंगी लागून शरीरास हितावह अअसे होते. त्याचप्रमाणे वाचायचे ग्रंथ जर लक्ष देऊन मनःपूर्वक असे बेताबेताने वाचले तर त्यापासून ज्ञानाचा लाभ होऊन निरनिराळ्या मानसिक शक्ती वृध्दिंगत होतात."

वाचनाचे महत्त्व अपार आहे. भरपूर आणि चिकित्सक वाचनाने आपले अनुभव प्रगल्भ होतात. प्रचंड माहिती संग्रही राहते. बहुश्रुतता प्राप्त होते. दृष्टी व्यापक होते. अध्ययन सखोल, तसेच अध्यापन सुलभ होते. स्वतःला आनंद मिळतो तसा तो इतरांनाही देता येतो. पुनःपुन्हा केलेल्या वाचनाने स्मरण वाढते. आपले मत / विचार निश्चित होण्यास मदत होते. मजकुरातील सामर्थ्य आणि दुबळेपणा समजता येतो. त्यातील पूर्वग्रह आणि प्रचार कोणते ते समजण्याची शक्ती, वाचनातील कल्पनांची सत्या-सत्यता आणि मूल्य यांचे आकलन करण्याचे सामर्थ्य तसेच मजकुरांची मांडणी, आशय मत आणि वाचनाचे बौध्दीक आकलन यात भर पडते. वाचनाचे महत्त्व सांगताना प्रा. उध्दव आढाव म्हणतात, "पूर्वीचा अनुभव आणि वाचनातून झालेले  नवे ज्ञान यांची सांगड घालून नवे आणि स्पष्ट ज्ञान प्राप्त करणे, व्यापक हिताचा, तार्किक प्रवृत्तीचा विचार करता, आपले विचार व आचार यांत सुधारणा करून आपले व्यक्तिमत्त्व अधिक समृध्द व स्थिर बनविण्यास वाचनामुळेच मदत होते. त्यांनीच पुढे असेही सांगितले आहे की, वाचनामुळे मनुष्यातील बहुश्रुतता वाढते, जिज्ञानापूर्ती होते. कल्पनाशक्तीचा विकास होतो. वाचनकौशल्यांचा विकास होतो. संस्कृतीची आणि परंपरेची ओळख होते.

प्रसिध्द ग्रंथपाल श्री. शा.रेगे म्हणतात, "जो वाचत नाही त्याला वाचनाची गोडी लावणे,

जो वाचतो त्याला अधिक वाचायला लावणे व जो अधिक वाचतो त्याला अधिक चांगले वाचायला लावणे" तर आगरकर लिहितात, "सर्व ज्ञानसाधनेत पुस्तकांचे वाचन अत्यंत महत्त्वाचे साधन आहे." डॉ. आंबेडकर म्हणतात "वाचन हा माझा श्वासोच्छवास आहे."

सतत बदलत राहणाऱ्या अधिकच गुंतागुंतीच्या होणाऱ्या परिस्थितीत मानव, वाचनापासून दूर राहू शकणार नाही. कारण अशा परिस्थितीत टिकून राहण्यासाठी 'वाचन' हा उपयुक्त मार्ग आहे.

अब्राहम लिंकण म्हणतात, "The things I want to know are in books. My friend is the man who'll get a book I din't read."- Franc's Bacon, therefore. rightly said that "reading maketh a full man."

वाचनाचे महत्त्व निर्विवाद आहे. त्यामुळे वाचनाद्वारे होणाऱ्या फायद्यांची केवळ यादी केली तरी त्याची व्याप्ती आपल्या लक्षात येते. तोच धडा वाचतानाची पध्दत तीच असून चालणार नाही. डिक्शनरीत शब्द शोधताना वापरायची पध्दत निराळी असेल तर वर्तमानपत्रावरून नजर फिरवताना वेगळी पध्दत वापरावी लागेल.

हा विविध पध्दतीवरुन वाचनाचे काही प्रकार पडतात. त्यामुळे हेतुप्रमाणे योग्य प्रकारचे वाचन केले पाहिजे.

### १. सर्वेक्षण (चाळणे - Skimming) :

एखादा मजकूर प्रथमच वाचायला आहे, त्याचा साधारण परिचय करून घ्यायचा आहे, असे असेल तर त्यातील ठळक गोष्टी समजल्या तरीही चालतात. अशा वेळी वेगाने पुस्तक वाचण्याचा उपयोग होतो. अगदी शब्दनशब्द वाचला नाही तरी चालतो. गोळाबेरीज अर्थ ध्यानात आला तरी पुरते. काही मजकूर निसटून गेला तरी फारसे बिघडत नाही. वर्षाच्या आरंभी नवी पुस्तके या पध्दतीने वाचावी.

### २. सूक्ष्म वाचन :

मजकूरातला अर्थ समजून घ्यायचा आहे, लक्षात ठेवायचा आहे, सर्व तपशील समजला पाहजे, काहीही निसटून जाता कामा नये, असे असताना सूक्ष्म वाचन करावे लागते. येथे वेगावर तुमचे नियंत्रण पाहिजे. हातात पेन्सिल हवी. वाचताना पुस्तकावर खुणा करा. महत्त्वाचे भाग अधोरेखित करा. वर्गात धडा शिकविण्यापूर्वी व धडा शिकविल्यानंतर या प्रकारचे वाचन करावे लागते.

### ३. पुनर्वाचन (उजळणीसाठी) :

बऱ्याचदा निवडक वाचन Selective Reading करावे लागते. येथे महत्त्वाचा मजकूर  सावकाश वाचावा लागतो. वाचताना वर्गात शिकवलेली, आपण संदर्भ पुस्तकात वाचलेली अन्य माहिती आठवावी लागते. त्या माहितीचा वाचत असलेल्या माहितीशी संबंध जोडावा लागतो. वाचताना मध्येच थांबून मजकुराबाबत विचार करवा लागतो. मनातल्या मनात माहितीची पुनर्मांडणी करावी लागते. उजळणीसाठी जर आपणच तयार केलेली टिपणे वाचत असू तर टिपणे संक्षिप्त असल्याने त्यात थोडक्यात लिहिलेल्या मजकुराचा मनातल्या मनात अर्थविस्तार करावा लागतो.

### ४. चिकित्सक वाचन :

अभ्यास करताना एखादी गोष्ट बरोबर आहे की चूक याचा विचार करत वाचन करावे लागते. दिलेल्या मजकुरातील गृहिते लक्षात घ्यावी लागतात. मजकुरातील मुद्यांची क्रमवारी लावावी लागते. थोडक्यात असलेल्या मजकुरातील माहितीचा जसाच्या तसा स्वीकार करायचा नसतो तर चिकित्सापूर्वक स्वीकार करायचा असतो. अशा वेळेचे वाचन हे चिकित्सक वाचन असते. अभ्यासाच्या वरच्या स्तरावर या प्रकारचे वाचन होणे आवश्यक असते.

प्रश्नपत्रिका हातात मिळाल्यानंतर पहिल्या पाच मिनिटात आपण ती या पध्दतीने वाचू शकलो तर अवघड प्रश्न कोणते ? सोपे प्रश्न कोणते? छोटे कोणते? इ. प्रकारे चिकित्सा करता येते.

**५. प्रतिसादी वाचन :**

ललित वाङ्मय असताना लेखकाने लिहिलेल्या प्रसंगामध्ये आपण गुंतून जातो. त्याच्या लेखनात आपण भावनिक प्रतिसाद देतो. एखादा दु:खद प्रसंग रंगवला असे तर आपल्याला रडू येते. विनोदी प्रसंगाला आपण खळखळून हसून दाद देतो. हे झाले प्रतिसादी वाचन. गणित / शास्त्रांसारख्या विषयात एखादी चमकदार कल्पना, युक्ती वापरून सिध्द केलेले एखादे प्रमेय यातील लेखकाच्या बुध्दीचातुर्याला आपण दिलेली दाद हेही प्रतिसादी वाचन होय. हा वाचनाचा प्रकार रसग्रहणात्मक अभ्यास करताना उपयोगी पडतो.

**६. कल्पक वाचन :**

एखादा मजकूर वाचत असताना आपल्याला नव्या कल्पना सुचायला लागतात. लेखकाने अर्धवट सोडलेली एखादी कल्पना आपण आपल्या प्रतिभेने पूर्ण करतो. अशा वाचनाला कल्पक वाचन म्हणतात. भाषा विषयांतील लेखनाची पूर्वतयारी करण्यासाठी कल्पक वाचन करता यावे लागते.

**७. शोधक वाचन :**

दिलेल्या मजकुरातून काही शोधून काढायचे असते. तेव्हा त्या मजकुराची बारकाईने छाननी करावी लागते. उदा. समानार्थी शब्द शोधायचे आहेत, समान गुणधर्माच्या रासायनिक पदार्थांची नावे शोधायची आहेत, विशेषणे शोधायची आहेत इ. माहितीची पुनर्मांडणी करण्यासाठी

आपल्याला शोधक वाचन करावे लागते. तसेच परिच्छेदातील मध्यवर्ती कल्पना शोधण्यासाठीही शोधक वाचन करावे लागते.

### ८. शब्दांशिवाय अन्य काही वाचन :

आपण नेहमीच काही छापील शब्द वाचत नाही. आईला राग आला आहे, हे तिच्या चेहऱ्याकडे बघून आपल्याला समजते. ताईला यावेळी त्रास दिलेला चालणार नाही, हे तिच्या आविर्भावाकडे पाहून आपल्याला समजते. बाबा आज काळजीत आहेत, ते त्यांच्या कपाळावरील आठ्या आपलयाला सांगातात. येथे आपण व्यक्तीचे चेहरे वाचतो. अर्थात दैनंदिन अभ्यासात या वाचनाचा प्रत्यक्ष उपयोग नसला तरी पुढे आयुष्यात यशस्वी व्हायचे असेल, तर अशी माणसे वाचायला यायला पाहिजे.

आपल्या दैनंदिन अभ्यासातही शब्दांशिवाय इतर काही वाचावे लागते. आकृत्या वाचाव्या लागतात. नकाशे वाचावे लागतात. चित्र पाहून त्यातील अर्थ समजून घ्यावा लागतो. विविध प्रकारचे आलेख असतात आणि त्या आलेखांचेही वाचन करून त्यातून ध्वनित केलेले अर्थ समजून घ्यावा लागतो. हे सारे वाचन आपले आकलन सुधारण्याच्या कामी उपयोगी पडते.

गाडगे महाराजांनी म्हटले आहे की, "हे सारे जग म्हणजे देवाने लिहिलेले पुस्तक आहे. खुशाल हिंडत ते वाचावे." असे वाचन हा व्यापक अभ्यासाचा मार्ग आहे.

एकूण काय तर उत्तम अभ्यासासाठी 'प्रसंगी अखंडित वाचीत जावे' हेच सूत्र मनाशी ठेवावे.

### ३.३ स्वयं अध्ययनात वाचनाचे महत्त्व :

स्वयं-अध्ययन या संकल्पनेमध्ये अनेक घटक समाविष्ट असतात. त्यामुळे स्वयं-अध्ययन म्हणजे काय ते खालीलप्रमाणे सांगता येईल.

१.	एकट्याने सक्रिय राहून केलेले अध्यन

२.	माहितीचे संकलन, वर्गीकरण वापर व मूल्यांकन

३.	नियमित , हळूहळू झेपेल तेवढा अभ्यास आणि

४.	स्मरण, विचार, कल्पना, सृजन यासारख्या प्रक्रियांचे आकलन

आपले लिखाण सुरू करण्यापूर्वीची एक महत्त्वाची आणि आवश्यक कृती म्हणजे वाचन. ज्याविषयाबद्दल आपल्याला लिहायचे आहे त्यासंबंधीचे उपलब्ध साहित्य म्हणजेच ग्रंथ, नियतकालिके, अन्य संदर्भस्त्रोत प्रथम काळजीपूर्वक व तपशीलवार वाचावे. त्यामुळे स्वतःच्या लेखन विषयाबद्दलचे दडपण कमी होते.

तुम्हाला महत्त्वाच्या वाटलेल्या मुद्यांच्या, उपघकांच्या थोडक्यात नोंदी करून ठेवा. आवश्यक तेथे महत्त्वाचे शब्द / मुद्दे अधोरेखित करा. अशा कृतीमुळे तुमची विचार प्रक्रिया कार्यान्वित होऊन आपण लिहिण्यास तयार होतो. म्हणजेच लेखनासाठी वाचन पूर्वतयारी आवश्यक असते.

"आधुनिक शिक्षण विचारांनुसार शालेय शिक्षण व्यवस्थेचे यश केवळ तेथे विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या ज्ञानाच्या आकरावरून न मोजता या विद्यार्थ्यांना शिकावयाचे कसे हे शिकविणे, म्हणजेच त्या विद्यार्थ्यांना स्वयंअध्यायी बनविणे, त्या व्यवस्थेने किती साध्य केले आहे त्यावरून मोजले जाते."

याबाबत यदुनाथ थत्ते म्हणतात, "ज्ञानाच्या कक्षा क्षणाक्षणाला इतक्या रूंदावत आहेत की, केवळ शिकवून आता भागणार नाही. कसे शिकावे ते शिकविले पाहिजे. शिदोरी बांधून घेऊन चालणार नाही. शिदोरी कशी तयार करावी ते शिकविले तरच जीवनाची वाटचाल सुखाची व आनंदाची होईल." शिक्षण तज्ज्ञांचा दाखला देऊन ते पुढे म्हणतात. "शिक्षणतज्ज्ञ म्हणून लागले आहेत की, (Teaching is teaching to think) शिकविणे म्हणजे विचार करायला शिकविणे" म्हणून विद्यार्थ्यास स्वतःचे शिक्षण स्वतःच घेता यावे यासाठी त्यांच्या

इतर कौशल्यांबरोबरच वाचन कौशल्य नीट विकसित होणे आवश्यक असते. याबाबत मेघालयाला राजगुरू असे म्हणतात. की, "वयानुसार किंवा त्यांच्या वाचनाच्या परिपक्वतेनुसार अर्थग्रहणाचा व आकलनशक्तीचा वेग वाढविला पाहिजे. हा प्रयत्न ज्याचा त्यानेच केला पाहिजे. त्याकरिता आकलन परिपूर्ण होण्यासाठी वाचनाला सक्रिय सहभाग वाढविणे हा एकमेव उपाय आहे. त्यामुळे लक्षात ठेवणे सोपे जाते. 'सक्रिय सहभाग' याचा अर्थ फक्त ओळीवर नजर फिरवून न वाचता मन संपूर्णपणे वाचण्याच्या कामात गुंतविणे, पुढे-पुढे वाचता जाण्यासाठी उत्सुकता, तत्परता जागी ठेवणे आणि आशयाबाबतच्या वेगवेगळ्या विचार प्रक्रिया डोक्यात चालू ठेवणे. वाचण्याच्या कामातील मनाची गुंतवणूक वाढावी यासाठी वेगवेगळ्या युक्त्या लढविता येतात.

## ३.४ वाचन प्रकियेतील घटक :

वाचन ही प्रक्रिया अतिशय विस्तृत स्वरूपाची आहे. त्यामध्ये खालील घटकांचा समावेश होतो.

१. शब्दबोध : नजर टाकताच शब्द लक्षात येणे.

२. वाचन दिशा : डावीकडून उजवीकडे व वरून खाली

३. पुनर्दृष्टिक्षेप : गरज नसताना पुन्हा पुनहा अलीकडील शब्दांवर नजर वळवू नये.

४. दृष्टीचा आवाका : एकाच दृष्टिक्षेपात एकदम २-३ शब्द वाचावेत.

५. शब्दोच्चारण : मूक वाचनात मोठ्याने उच्चार करावयाची गरज नाही.

६. आकलन : अनावश्यक बाबींकडे दुर्लक्ष करून हव्या त्या बाबी लक्षात घेणे.

७. आस्वाद : शब्दांच्या छटा समजून घेऊन आशयाचा अर्थ लावणे.

८. शब्दसंग्रह : वाचणाऱ्या व्यक्तीजवळ असलेल्या शब्दांच्या साठ्यानुसार आकलन

## ३.५ वाचनाची उद्दिष्ट्ये :

### i) माध्यमिक स्तरावरील वाचनाची उद्दिष्ट्ये :

१. योग्य ती गती राखून साहित्याचे अर्थपूर्ण प्रकट वाचन करता येणे.

२. योग्य रीतीने मूकवाचनाद्वारे पठित व अपठित साहित्यातील आशयाचे पुरेसे आकलन करता येणे.

३. वाचलेल्या भागावर विचारलेल्या प्रश्नांची बिनचूक उत्तरे देता येणे.

४. वाचलेल्या उताऱ्यातील मध्यवर्ती कल्पना व प्रमुख मुद्दे सांगता येणे आणि त्याचे टिपण करता येणे.

५. अर्वाचीन व प्राचीन अभिजात सहित्याची तोंड ओळख होऊन त्या प्रकारच्या साहित्याची आवड निर्माण होणे.

६. आपल्या राष्ट्राच्या सांस्कृतिक परंपराची माहिती मिळवून राष्ट्रातील भावनिक एकात्मता वाढीस लावणे.

७. वाङ्मयप्रकारांचा स्थूल परिचय त्यातून विषय व आशय यांच्या अनुरोधाने त्या वाङ्मय प्रकारांची परिणामकारकता ओळखणे.

८. वाचलेल्या साहित्यातील भाषिक सौंदर्याची लयबध्दता, नादमाधुर्य, विचारांची मांडणी, योजलेली प्रतिके इत्यादींचा आस्वाद घेता येणे.

९. आपल्या शब्दासंपत्तीत क्रमाक्रमाने जाणीवपूर्वक भर टाकणे.

१०. वाचनात येणारे प्रादेशिक शब्द, वाक्यप्रचार, म्हणी आणि वाक्य रचनेचे प्रकार याचा अर्थ समजावून घेऊन त्यांचा योग्य वेळी उपयोग करण्याची क्षमता प्राप्त करून घेणे.

११. वाचलेल्या साहित्यातील आशयाचे व्यक्तिगत व सामाजिक दृष्टिकोनातून महत्त्व समजावून घेणे.

१२.	विविध साहित्याच्या वाचनामुळे आपले अनुभवक्षेत्र रूंदावणे.

**ii) प्राथमिक स्तरावरील वाचनाची उद्दिष्टये :**

१.	शुध्द उच्चार, योग्य स्वाराघात व योग्य अभिव्यक्ती यांचा योग्य मेळ साधून अस्खिलत व प्रकटपणे वाचता येणे.

२.	अर्थ समजावून घेऊन मूक वाचन करण्याची सवय लावणे.

३.	चांगली पुस्तके वाचण्याची आवड उत्पन्न होणे.

४.	शब्दांचा शुध्द उच्चार करून प्रकटपणे वाचता येणे.

५.	योग्य आघातांसह स्वाभाविकपणे व योग्य ठिकाणी जोर देऊन वाचता येणे.

६.	समजपूर्व वाचता येणे.

७.	सविरामचिन्हे लक्षात घेऊन अस्खलितपणे वाचता येणे.

**३.६ चुकीच्या वाचन सवयी :**

वाचनाचे सर्व फायदे मिळावेत असे आपणास वाटते. पण काही वेळा आपल्या चुकीच्या सवयीमुळे वाचन नीट होत नाही. काही चुकीच्या सवयी पुढे दिल्या आहेत.

१.	वाचत असताना बऱ्याच व्यक्तींना वाचत असलेल्या ओळीवर बोट अगर पेन्सिल ठेवून वाचण्याची सवय असते. त्यामुळे वाचन वेग कमी हेऊन परिणामी आकलनावरही परिणाम होतो.

२.	बऱ्याच लोकांना मजकूर मोठ्याने वाचनाची सवय असते. मोठ्याने वाचण्याचेही काही फायदे आहेत. परंतु सर्वच वाचन मोठ्याने करणे हितावह नसते.

३.	वाचन करत असताना ओठांच्या स्वरयंत्राच्या हालचाली करण्यामुळे वाचन वेगावर तसेच आकलनावर परिणाम होतो.

४. वाचन करत असताना नजर सतत पुढे सरकली पाहिजे. वाचत असताना तुमची नजर पुन: पुन्हा वाचलेल्या शब्दांवर जात असल्यास ती सवय घातक होय.

५. एखादे वाक्य वाचताना नजर मोजक्याच ठिकणी फिरली पाहिजे. मंद गतीने वाचणारे वाचक एकच वाक्य खूप टप्पे पाडून वाचत असतात. त्यामुळे अडथळे येतात.

६. वाचनाची दिशा डावीकडून उजवीकडे अशी असते. पण त्यासाठी काहीजण सतत डावीकडून उजवीकडे मान फिरवीत असतात. त्यामुळे वाचन वेग मंदावतो व तसे समाजरुढीप्रमाणे वाईट दिसते.

वरीलपैकी कोणती सवय आपणास आहे हे, आपल्याच वाचनाचे काळजीपूर्वक निरीक्षण करून पाहता येईल. अशाच काही सवयी असतील तर पुढील उपाययोजना करून प्रयत्नपूर्वक आपली चुकीची सवय सोडून देता येईल. वाचन क्षमतेबद्दल मनोहर नाईक म्हणतात. "माणूस आपल्या स्थिर नजरेच्या काळात किती शब्द अगर किती अक्षरे ओळखू शकतो हे त्याच्या ग्रहणक्षमतेवर आणि बुध्दिमत्तेवर अवलंबून असते. त्याचबरोबर ते वाचणाऱ्याच्या विषयाच्या पूर्ण माहितीवर, शब्दांच्या आणि कल्पनांच्या आकलनावर, लिहिणाऱ्या शैलीवर आणि त्याची लिखाणाची भाषा कितपत सोपी-सरळ आहे त्यावर अवलंबून असते."

डोके हलवणे, ओठ हलवणे, पुटपुटणे, वाचलेलेच पुन्हापुन्हा वाचणे, मजकुरावरून बोटट फिरवीत वाचणे अशा सवयीमुळे वाचताना अधिक वेळ लागतोच; पण वाचलेले समजण्यासही वेळ लागतो. यासाठी अशा सवयी टाळण्याचा निश्चयपूर्वक प्रयत्न केला पाहिजे, अशा सवयी घालवण्यासाठी खालील उपाय करता येतील.

## ३.७ वाचन सुधारायचे कसे?

१. वाचता डोके प्रयत्नपूर्वक स्थिर ठेवा.

२. ओठांवर एक बोट ठेवल्यास ओठ हलवायचे नाहीत ते लक्षात राहील.

३. पुटपुटण्याची सवय जावी यासाठी वाचताना १, २, ३, ४ असे आकडे म्हणा म्हणजे ही सवय हळूहळू जाईल.

४. पुन्हा - पुन्हा तेच वाचण्याची सवय टाळण्यासाठी जो मजकूर वाचत असाल त्यावर पुठ्ठ्याचे वा वहीचे झाकण ठेवून त्याखाली संपूर्ण आळ झाका. जसजशा ओळी वाचून होतील तसतसे झाकण खाली सरकवा म्हणजे ह्या सवयीबरोबर मजकुरावरून बोट फिरवित वाचण्याची सवय असल्यास तीही दूर होईल.

वाचनवेग वाढविण्यासाठी वेळ लावून वाचन करण्याची सवय लावून घ्या. बेधडक वाचा. वाचत असताना वाचलेले लक्षात राहील की नाही याची काळजी करत बसू नका.

मोठ्याने वाचल्यावर लक्षात राहते, अशी आपली समजूत असते, पण ती चुकीची आहे. संशोधनाने हे सिध्द झाले आहे की, मोठ्याने उच्चार करून अगर मनातल्या मनात शब्दोच्चार करून दर मिनिटात जास्तीत जास्त २५० ते ३०० शब्द वाचता येतात. पण शब्दोच्चारण मोठ्याने अगर मनात न करता वाचल्यास एका मिनिटात ८०० शब्द देखील वाचले जाऊ शकतात. म्हणून केवळ नजरेणेच वाचण्यास शिकणे आवश्यक आहे.

### ३.८ पुस्तके आणि विद्यार्थी यांचा संबंध :

विद्यार्थी आणि ग्रंथ वा पुस्तके म्हणजे एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. एकाच्या अस्तित्वाशिवाय दुसऱ्याचे अस्तित्व अपर्ण आहे. अगदी प्राचीन काळातील ऋषीमुनिंनी आपले ज्ञान ताडपत्रावर, भूर्जपत्रावर, धातूंच्या पत्र्यावर, शिळेवर अंकित करून ठेवलेले दिसते. उद्देश हाच की ते ज्ञान वा कला पुढील पिढीसाठी कायम राहावे म्हणजे पर्यायाने पुढील पिढीने ते वाचावे.

आज मानवाच्या जीवनात कागद आला. त्याने मानवी जीवनात आणि शिक्षणाच्या

प्रांतात क्रांती केली. त्यामुळे ज्ञान संग्रहित करून शिक्षण देणाऱ्यांसाठी व ते प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत सोयीचे झाले आहे. विविध शाखांचे शिक्षण ग्रंथाच्या माध्यमातून सामावून ठेवलेले दिसते.

विद्यार्थ्यांना विविध शाखांचा अभ्ययास गुरूंच्या मदतीने पूर्ण करवा लागतो. ग्रंथदेखील विद्यार्थ्यांच्या ठिकाणी गुरूस्थानी आहेत. म्हणून ग्रंथाबद्दलची आवड ज्याच्या ठिकाणी असेल आणि ज्याने विविध विषयावरील ग्रंथ वा पुस्तके वाचली असतील तर तो खऱ्या अर्थाने श्रीमंत मनुष्य म्हणावा लागेल. कारण ग्रंथाच्या अध्ययनाच माध्यमातून त्याने जे ज्ञान, शिक्षण, संस्कार, प्राप्त केले ते दीर्घकाळ टिकणार आहे.

विद्या, धन प्राप्त करावयाचे असे तर ग्रंथ व पुस्तकांना अनन्यभावे शरण जाऊन त्यातून सामावलेले ज्ञान प्राप्त करण्याची साधना करावी लागते. ही साधना म्हणजेच शिक्षण होय. ग्रंथ विद्यार्थ्यांच्या मनातील अज्ञानाचा अंधःकार दूर सारून त्या ठिकाणी ज्ञानाची प्राप्ती पसरविते. त्याचे अंतःकरण ज्ञानाने उजळून निघते. चांगले काय, वाईट काय ते काळण्याची क्षमता त्याचे ठिकाणी निर्माण होते. दैनंदिन गरजा जेवढ्या महत्त्वाच्या तेवढे ग्रंथाचे वा पुस्तकांचे वाचन विद्यार्थ्यांसाठी मोलाचे आहे.

वि.स. खांडेकर असे म्हणतात, वाचक वर्ग आयत्या तयार रूपात कधीच असत नाही. तो तयार करावा लागतो. कवी जन्मावा लागतो तो तयार करता येत नाही तसा वाचक जन्मलेला असतो; पण त्याला तयार करणे जरूर असते.

### ३.९ काय वाचावे? कसे वाचावे?

ज्या भाषणाने अंतरंगात झालेले समाधान मोडेल, केलेला निश्चय मोडेल, ते भाषण ऐकू नये. एका ग्रंथाने घेतलेला निर्णय दुसऱ्याने खोटा ठरवावा; असे झाले म्हणजे जन्मभर संशय वाढत जाईल. म्हणून ज्यामुळे संशय फिटेल, शंकानिरसन होईल असे अद्वैत ग्रंथ श्रावण

करावे. जगात ज्याची उपासना जैसी प्रीती वाटे तैसी ।। तेथे वर्णिता दुजायासी। प्रशस्त न वाटे।

जो आत्मज्ञानी पुरुष आहे त्याला इतर काही आवडणार नाही. आत्मज्ञानाशिवाय ग्रंथ वाचला तर समाधान होणार नाही. थोडक्यात ज्याला स्वहित साधावयाचे असेल त्याने नेहमी अद्वैत निरूपण करणाऱ्या ग्रंथाचेच श्रवण व मनन करावे.

वाचक वर्गाने दोन गोष्टी मनावर घेतल्या पाहिजेत, असे खांडेकर सांगतात. पहिली गोष्ट, वाचक वर्गाने आपली आवड, निवड निःसंदिग्धपणे व्यक्त करणे आणि दुसरी गोष्ट खऱ्या उच्च दर्जाच्या वाङ्मयाचा सक्रिय आदर करणे.

### ३.१० वाचन कौशल्य :

मूल वाचायला शिकते म्हणजे वाचन कौशल्य आत्मसात करते आणि वाचनक्षमता प्राप्त ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या दृष्टिकोनाचा स्वीकार करते. वाचन कौशल्याबाबत सतीश पोरे म्हणतात "वाचन ही केवळ एकच प्रक्रिया नाही, तर अनेक लहान - लहान क्रिया त्यामध्ये सामावलेल्या आहेत. छापील मजकुराचे वाचन करताना आणि त्या मजकुराचा अर्थ लावताना मूळ वाचनकौशल्यांतर्गत असलेल्या सर्व क्रिया करते. यामध्ये शब्दकौशल्ये, शब्दार्थ जाणण्याचे कौशल्य, आकलन कौशल्य, अध्ययन कौशल्य, कौशल्याचे उपयोजन इत्यादीचा समावेश आहे.

वाचन कौशल्यात आकलनाला महत्त्व आहे या बाबतीतला मुद्दा करताना श्री. सतीष पोरे यांनी सांगितले की, 'बेंजामिन ब्लूम या शिक्षणतज्ज्ञाने शिक्षणाच्या उद्दिष्टांचे वर्गीकरण ६ मुद्यांत केले होते. त्यानंतर एडवर्ड फ्राय यांनी वाचन वेगाबाबत डॉ. टेलर व डॉ. जॉन बोरमधून यांनी वाचन चाचणीच्या संदर्भात जे संशोधन केले त्यावेळी वाचन आकलनात खालील मुद्यांचा समावेश केला होता.

१. शब्दार्थ जाणणे, २. घटना ओळखणे, ३. क्रम ओळखणे, ४. मध्यवर्ती कल्पना ओळखणे, ५. लेखकाचा उद्देश जाणणे, ६. कार्यकारण अनुमान बांधणे, ७. अनुमान बांधणे, ८. मिळालेल्या ज्ञानाचे उपयोजन करणे, ९. रसग्रहण करणे.

वाचन कौशल्याचा विकास करताना तसेच मूल्यमापनाच्या वेळी शिक्षकाने वरील मुद्दे डोळ्यासमारे ठेवणे आवश्यक आहे. श्रीमती गीतांजली देगावकर यांनी वाचनकौशल्यात खालील मुद्यांचा समावेश करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. १. न अडखळता वाचणे, ७. वाक्याचे टप्पे करता येणे.

### ३.११ वाचनपूर्व तयारीचे महत्त्व :

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन पुणे येथील माजी प्रा. डॉ. व सी. देशपांडे यांनी वाचनकौशल्यात वाचनपूर्व तयारीचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे मत व्यक्त केले. ते म्हणाले, विद्यार्थ्याला पाठ्यपुस्तक वाचता आले नाही, तर त्याचा आय.क्यू. (बुध्यांक हा मराठी शब्द वापरला जात नाही) कमी आहे किंवा शिक्षक कुचकामी आहेत, असा निष्कर्ष काढला जातो.

डॉ. देशपांडे यांनी वाजनपूर्व करिता खालील प्रमाणे कार्यक्रम सुचविला.

१. नामपट्या ओळखणे.

२. चित्र ओळखणे / वर्णन करणे.

३. साभिनय गोष्ट सांगणे.

४. साभिनय बडबडगीते / कविता गाणी म्हणणे.

५. खेळ खेळणे

६. चित्र काढणे / रंगविणे

७.	गोष्ट / कविता वाचून दाखविणे.

छापील अक्षरांकडे पाहून बडबड पाहून बडबड करणे (barking at prints) म्हणजे वाचन नव्हे तर तुमच्या मनातील विचारप्रक्रिया जेव्हा चालू होते ते खरे वाचन.

## ३.१२ प्रसार माध्यमांचा परिणाम :

आजचा काळ नभोवाणी, दूरचित्रवाणी, चित्रपट, संगणक यांच प्रभावांचा काळ आहे. माणसाने माणसांसाठी निर्माण केलेल्या या सोयी आहेत. या अत्याधुनिक सुखसोयीमुळे माणसाचे वाचन कमी होत चालले आहे. अशा परिस्थितीमध्ये शाळेमध्ये मुले जेवढा काळ शिक्षण घेत असतात त्या काळात तरी त्यांना चांगले साहित्य वाचण्यासाठी उपलब्ध करून दिले पाहिजे. जेणेकरून मुलांच्या मनावर चांगले संस्कार बिंबून ते उत्तम नागरिक बनण्यास सक्षम होतील.

प्रा. वसंत सावे यांनी वाचनसंस्कृती आणि ग्रंथसनद या लेखात असे म्हटले आहे की, इलेक्ट्रॉनिक माध्यमामुळे मौखिक भाषासंस्कृतीचे, ग्रंथसंस्कृतीचे पर्यायाने वाचन संस्कृतीचे महत्व कमी होईल, असे भविष्य वर्तविले जात आहे. दूरदर्शन, संगणक, सी.डी.रॉम, इंटरनेट यासारख्या माध्यमांमुळे लोकांमधील वाचनाची आवड टिकून राहील की नाही, ग्रंथांना भवितव्य आहे की नाही अशी भिती व्यक्त केली जात आहे. ही भीती अगदीच निराधार आहे. असे म्हणता येणार नाही ; पण या नवीन माध्यमांमुळे वाचनसंस्कृतीवर विपरीत परिणाम झाला तरी तो संपूर्ण नष्ट होईल, असे म्हणणे चुकीचे आहे.[४२]

टी.व्ही. चा वाचनावर झालेला परिणाम सांगताना रेवती नरगुंदे म्हणतात, वाचनासाठी वेळ काढण्याऐवीज टी.व्ही बघणे ही आधुनिक युगातील आवडीची गोष्ट आहे हे मान्य करावे लागते. जगभरातील घटनांची माहिती करून घेण्यासाठी टी.व्ही. बघणे उपयुक्त ठरते. मग शब्दांचे माध्यम असणारे लेखन, वाचनव इलेक्ट्रॉनिक्सचे जेव्हा माध्यम असणारा टी.व्ही. यात विरोध (conflict) निर्माण होण्याचे कारण नाही. फक्त ग्रंथ हेच मनोरंजनाचे साधन होते तेव्हा

इतकी लोकप्रियता कदाचित आता राहणार नाही. पण ज्ञान व माहिती मिळविण्यासाठी ग्रंथाचेच वाचन करणे सायीस्कर वाटत राहील. कारण ग्रंथाची पाने वाचून झाल्यावरही पुन्हा उलटून मागे जाऊन पाहता येते. इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांसाठी ते इतके सुलभ नसते. या शिवाय टी.व्ही. सारखे साधन आपले पुर्ण लक्ष वेधून घेऊ शकत नाही. त्यामुळे टी.व्ही. वरील गोष्टींची नोंद मेंदूमध्ये होईलच असे नाही. याऊलट ग्रंथातील शब्दांचे आकलन होत असल्याने त्याचे वाचन करताना आपले सारे लक्ष केंद्रित होते. त्यामुळे जास्त गोष्टी जास्त काळ लक्षात राहू शकतात.४३ प्रसार माध्यमांचा कुटूंबातील सर्व घटकांवर विपरित परिणाम होताना दिसत आहे. याबाबत डॉ.प्रा.अ.श्री. भडकमकर यांनी शारदा संगीत पुस्तकांच्या परिचयात्मक लेखात असे म्हटले आहे की, 'टी.व्ही, व्ही.सी.आर., कॉम्प्युटर गेम्सच्या सांस्कृतिक, विशुध्द, कलात्मक आणि वाङमयीन अनुभवांचा आस्वाद घेण्याकडे स्वत:ला सुसंस्कृत समजण्याचे पालक व शिक्षकसुध्दा यात अलीकडे कमालीचे दुर्लक्ष होऊ लागले आहे. याबाबत सतीश पोरे यांनी आपल्या वाचन संस्कार या पुस्तकात असे म्हटले आहे की, वाचायला येते पण टी.व्ही. असल्यास वाचनाची गरज भासत नाही. शिक्षणतज्ञांना ज्यावेळी त्यातला धोका उमगला, त्यावेळी त्यांनी बॅक टू बेसिक अशी चळवळ उभारली.

# प्रकरण चौथे

# माहिती संकलन

४.१ प्रस्तावना

४.२ प्रश्नावली

**प्रस्तावना :**

संशोधनासाठी एखाद्या विषयाची निवड केली तर त्या विषयाच्या अनुषंगाने माहिती गोळा करण्याचे काम करावे लागते. संशोधन पध्दतीशी संबंधित तंत्रानुसार माहिती गोळा करणे आवश्यक असते व नंतर गोळा केलेली माहितीचे विश्लेषण करुन सुसंघटीतपणे मांडली जाते. माहिती संकलन ही संशोधनाच्या आयोजनातील महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे.

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र यातील माहिती वा शब्द डेटा, इन्फॉर्मेशन इंटेलिजिन्स आणि नॉलेज या संज्ञासाठी वापरण्यात येतो. माहितीच्या आधारे तपशील काढून तिच्या आधारे चर्चा, निर्णय घेवून निष्कर्ष काढला जातो. या क्रियेला माहिती म्हणतात.

माहितीचे स्वरुप समजण्यासाठी Data या इंग्रजी शब्दाची व्हॅन ऑल्फन यांनी Data are bit of factual information वस्तू स्थिती दर्शक तपशील म्हणजे प्रसारण आणि चिकित्सा करण्यात योग्य प्रक्रियाशील असा साचेबध्द तपशील आणि संकल्पना किंवा सूचना माहिती संकलन करण्यासाठी, प्रश्नावली व मूलाखत ही साधने वापरण्यात येतात. परंतू अभ्यासकाने प्रश्नावली हे एकच साधन वापरले जाते.

**प्रश्नावली :**

पाहणी संबंधी रिसर्च करुन समस्येची उकल होते. सत्यशोधक वस्तूस्थिती यथार्थ निघतो. त्यामध्ये त्या सत्यशोधन पाहणी तंत्राचा अवलंब करावा लागतो. त्यावेळी पाहणीसाठी निवडलेल्या समूहाचा नमूना दूरवर पसरलेला असतो. तेंव्हा प्रश्नावली द्वारे माहिती जमा केली जाते. प्रस्तुत अभ्यास करण्यासाठी प्रश्नावली या साधनाचा उपयोग केला आहे.

**व्याख्या :**

"लिखित प्रश्न व लिखित प्रत्युत्तर म्हणजे प्रश्नावली होय."

**प्रश्नावलीचे वैशिष्ट्ये :**

१) प्रश्नांची उत्तरे उत्तरदाता स्वतः भरतो.

२) आवडत्या विषयी संबंधी ठामपणे उत्तर देऊ शकतो.

३) प्रश्नावलीचे उत्तर देत असताना कोणताही दबाव नसतो.

४) लोकांकडून माहिती घेण्याची ही पध्दत सर्वात महत्वपूर्ण आहे.

**प्रश्नावलीचे प्रकार :**

१) संरचित प्रश्नवली

२) असंरचित प्रश्नावली

३) बंदिस्त प्रश्नावली

४) मूक्त प्रश्नावली

५) मिश्रीत प्रश्नावली

६) चित्रमय प्रश्नावली

प्रस्तुत संशोधनात बंदिस्त पध्दतीचा वापर केला आहे. बंदिस्त प्रश्नावलीत प्रत्येक महत्त्वाच्या प्रश्नामुळे संशोधक उत्तर सूचित करतो जो पर्याय योग्य वाटतो तो पर्याय निवडतो. उत्तरांचे विश्लेषण करणे सोपे जाते.

बंदिस्त प्रश्नावली चा सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे सर्व उत्तरे उत्तरदात्याला प्रश्नावलीतील प्रश्न सोपी जातात.

अभ्यासकाने प्रस्तुत संशोधन करण्यासाठी प्रश्नावली या तंत्राचा वापर करुन माहिती संकलित केली आहे.

**प्रश्नावलीच्या आधारे माहितीचे संकलन :**

| महाविद्यालयाचे नाव | वाचकांची संख्या | एकूण |
|---|---|---|
| कृषी महाविद्यालय, लातूर | प्राध्यापक - २२ | २२ |
| | विद्यार्थी - ८१ | ८१ |
| **एकूण** | | **१०३** |

अभ्यासकाने प्रस्तूत प्रकल्पासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. तर साधन म्हणून प्रश्नावलीचा आधार घेतला आहे. संशोधकाने कृषी महाविद्यालय, लातूर येथिल ग्रंथालयाचा समावेश केला आहे. ग्रंथालयाचा समावेश केला आहे. महाविद्यालय ग्रंथालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांना (वाचकांना) महाविद्यालयात जावून प्रश्नावली देण्यात आली. वाचकांना कोणत्या आवडी आहेत? कोणते वाचन साहित्य आवडते? हे जाणून घ्यावयाचे होते.

सदर प्रस्तूत प्रकल्पमध्ये एकूण विद्यार्थी ८४० आहेत तर त्यांच्या १० टक्के म्हणजेच ८१ विद्यार्थी प्रकल्पाचा संशोधन करण्यासाठी वापर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे प्राध्यापक वर्ग १२० आहेत तर त्याच्या २० टक्के म्हणजेच २२ प्राध्यापक हे प्रकल्पाचा संशोधन करण्यासाठी वापरात आणण्यात आले आहेत.

प्रथम अभ्यासकाने प्रश्नावली तयार केली नंतर त्यातील चूका सूधारल्या व व्यवस्थित केल्या व त्याच्या म्हणजेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नावली ८१ प्रति (झेरॉक्स) काढल्या तसेच प्राध्यापकाच्या प्रश्नावली २२ प्रति (झेरॉक्स) काढल्या. त्या सर्व प्रश्नावल्या वाचकामध्ये वाटल्या. त्यामध्ये वाचनाच्या सवयीविषयक अनेक वेगवेगळे प्रश्न विचारण्यात आले.

